१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शुक्रवार ५ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-९२, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 92 Marathi - Daily - Mumbai, 5 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in

Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

कॉकरोच जनता पार्टीचे ३ नवीन प्रवक्ते कोण?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## काकडेंची १५० कोटींची संपत्ती जय पवारांना १० कोटी दिले?



**भाजपातून राष्ट्रवादी अजित पवार गटात येऊन तात्काळ पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक लढविणारे संजय काकडे यांचे पुत्र विक्रम संजय काकडे यांच्या प्रतिज्ञापत्रातून त्यांच्या आर्थिक व्यवहारांची आणि मालमत्तेची माहिती उघडकीस आली आहे. सुमारे १५० कोटी रुपयांच्या मालमत्तेचे मालक असलेल्या विक्रम काकडे यांनी विविध व्यक्ती आणि कंपन्यांना कोट्यवधी रुपयांचे कर्ज दिले असून, त्यामध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा जय पवार यांना दिलेल्या १० कोटी रुपयांच्या कर्जाची विशेष चर्चा सुरू झाली आहे.**

■ पुणे

**विक्रम** काकडे यांनी मात्र हे कर्ज नसल्याचे म्हटले आहे. विक्रम काकडे म्हणाले की, हे कर्ज नव्हे तर ॲडव्हान्स आहे. आमच्या शेजारचा प्लॉट आम्हाला घ्यायचा होता तो जय पवार यांचा आहे. त्या प्लॉटच्या खरेदीसाठी गेल्या वर्षी हा ॲडव्हान्स मी दिला होता. त्यांचे हे विधान आणि पक्ष प्रवेश करताच मिळालेली

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

आमदारकीची उमेदवारी यामुळे वेगळीच चर्चा रंगली आहे. » पान ७ वर

# निवडणूक बिनविरोध करण्यासाठी महायुतीची धावपळ

## १७ पैकी ६ जागा बिनविरोध! मविआला धक्का

■ मुंबई

**विधानपरिषद निवडणुकीत विजयासाठी १७ पैकी एकाही मतदारसंघात पुरेसे संख्याबळ नसताना मविआने निवडणूक बिनविरोध होऊ नये, यासाठी महायुतीविरोधात आव्हान उभे केले होते. आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ५ ठिकाणी मविआच्या उमेदवारांनी धक्कादायक माघार घेऊन महायुतीच्या उमेदवारांचा विजयाचा मार्ग मोकळा करून दिला. त्यामुळे १७ पैकी ठाणे, पुणे, कोकण, यवतमाळ, वर्धा, अहिल्यानगर या ६ मतदारसंघात महायुतीचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत.**




**निवडणूक** होऊ न देता बिनविरोध जिंकायची, हे सूत्र गेल्या काही वर्षांपासून आपल्या देशात सत्ताधाऱ्यांनी प्रचलित केले आहे. त्यानुसार महायुतीने विधान परिषदेची निवडणूकही एकतर्फी करण्यासाठी अखंड धावपळ केली. ६ ठिकाणी मविआला जोरदार धक्का दिला. यासाठी महायुतीने साम, दाम, दंड, भेद, अशा सगळ्याचा वापर केल्याचा आरोप मविआने केला आहे.

विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संख्याबळ नसूनही मविआने महायुतीला आव्हान देण्याचा निर्णय घेतला होता. अनेक ठिकाणी महायुती आणि मविआ दोन्हींकडील काही बंडखोरही निवडणूक रिंगणात उतरले होते. त्यामुळे निवडणुकीत काही प्रमाणात चुरस निर्माण झाली होती. परंतु आज अर्ज भरण्याची मुदत संपण्यापूर्वी महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी चक्रे फिरवत अनेकांचे बंड थंड केले. शिवाय पडद्यामागून सूत्र हलवत मविआच्या उमेदवारांनाही माघार घ्यायला लावली. ठाणे, पुणे, कोकण, यवतमाळ, सोलापूर मतदारसंघात महायुती उमेदवारांविरोधात एकही उमेदवार रिंगणात उतरला नाही. मतदानाच्या आधीच या मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत.

कोकण मतदारसंघात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते खा. सुनील तटकरे यांचे पुत्र अनिकेत तटकरे यांना महायुतीकडून उमेदवारी मिळाली होती. रायगड जिल्ह्यात तटकरे आणि शिंदेंचा गोगावले गट यांच्यात जुने वैर आहे. त्यामुळे अनिकेत तटकरे यांच्या उमेदवारीला शिंदे गटाकडून जोरदार विरोध झाला. शिंदे गटाचे अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्या जुईली दळवी हिने अपक्ष अर्ज भरला होता. परंतु सुनील तटकरे यांनी एकनाथ शिंदे आणि भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची मनधरणी करण्यात यश मिळवले. त्यामुळे ज्युईली दळवी यांनी काल आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. मात्र, अनिकेत तटकरे यांना उबाठाच्या बाळ माने यांचे आव्हान कायम होते. तिथेही बाळ माने यांना आपल्या गोटात घेण्यात भाजपा यशस्वी झाली. आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपाचे मंत्री नितेश » पान २ वर

### आमचा बाप काढला, शिवीगाळ केली नाशिकमध्ये गोकुळ गीतेंची माघार नाहीच

नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील महायुतीने प्रतिष्ठा पणाला लावली पण याच ठिकाणी बंडखोरी झाली. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यापासून ते अर्ज माघारीच्या अखेरच्या क्षणापर्यंत नाशिकमध्ये मोठे राजकीय नाट्य रंगले. महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचे पुत्र कुणाल दराडे यांनी फोनवरून शिवीगाळ करत धमकी दिल्याचा आरोप करत भाजपाचे बंडखोर उमेदवार गोकुळ गीते यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे शेवटच्या क्षणापर्यंत सुरू असलेल्या मनधरणीच्या प्रयत्नांनाही यश आले नाही. नाशिक विधान परिषद निवडणुकीची जागा शिंदे गटाच्या वाट्याला गेली असून नरेंद्र दराडे हे अधिकृत उमेदवार आहेत. पण जागावाटप होण्यापूर्वीच भाजपाचे नेते गणेश गीते यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्याचवेळी त्यांचे बंधू गोकुळ गीते यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. गीते बंधूंनी उमेदवारी मागे घ्यावी यासाठी » पान २ वर

## मोसमी पाऊस केरळात पोहोचला ६ जूनपासून दक्षिण महाराष्ट्रात

■ मुंबई

**भारतीय** हवामान विभागाने (आयएमडी) आज मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल झाल्याची घोषणा केली. नेहमीच्या वेळेपेक्षा ३ दिवस उशिराने आलेला मान्सून आता हळूहळू पुढे सरकत असून ६ जूनला तो दक्षिण महाराष्ट्रात पोहोचेल, असा अंदाज आहे. हवामान खात्याने यापूर्वी मान्सून २६ मे रोजी केरळमध्ये पोहोचेल, असा अंदाज वर्तवला होता.

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, मोसमी पावसाने केरळसह लक्षद्वीप, तामिळनाडू, कर्नाटक आणि अरबी समुद्रातील काही भाग व्यापले आहेत. वातावरणातील अनुकूल परिस्थितीमुळे पुढील काही दिवसांत त्याची आगेकूच होईल. पुढील दोन ते तीन दिवसांत गोवा, महाराष्ट्राचा काही भाग, सोबतच तामिळनाडू, कर्नाटक, बंगाल उपसागराचा काही भाग आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये मान्सूनच्या



आगमनासाठी अनुकूल परिस्थिती आहे. राज्यात ६ जूनपासून कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे आणि सिंधुदुर्ग-रत्नागिरीच्या काही भागांत ढगाळ वातावरणासह पावसाची » पान ७ वर

## संतोष देशमुख प्रकरणाची पुढील सुनावणी १५ जूनला

■ बीड

**बीडच्या** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची पुढील सुनावणी १५ जून रोजी होणार आहे. या प्रकरणातील आरोपी विष्णू चाटे याने दाखल केलेल्या जामीन अर्जावर सरकारी पक्षाकडून लेखी म्हणणे सादर करणे अद्याप बाकी आहे. सुनावणीदरम्यान विष्णू चाटे यांचे वकील निलेश यादव यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना, १८ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आलेली अटक बेकायदेशीर असल्याचा दावा केला. अटकेच्या वैधतेबाबत त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. पुढील सुनावणीत विष्णू चाटेच्या जामीन अर्जावर सविस्तर युक्तिवाद होण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील इतर प्रलंबित अर्जांवरही न्यायालयाकडून आदेश दिले जाऊ शकतात.

## अपात्र बहिणींवर सरकारने २६ हजार कोटी उधळले

■ मुंबई

**मुख्यमंत्री** माझी लाडकी बहीण ही योजना सुरुवातीपासूनच चर्चेत आणि वादात राहिली आहे. ही योजना महायुतीसाठी फायद्याची ठरली असली तरी पात्र-अपात्र यांची छाननी न करता निवडणुकीच्या तोंडावर त्यावर केलेला अवाढव्य खर्च हा वादाचा आणि चिंतेचा विषय राहिला आहे. आता निवडणूक संपल्यावर सरकारने पडताळणी केल्यावर तब्बल ८१ लाख लाभार्थी अपात्र ठरले आहेत. या अपात्र लाभार्थ्यांवर महायुती सरकारने जनतेच्या करातून जमा होणाऱ्या पैशातून तब्बल २६ हजार कोटी रुपये उधळले आहेत.

लाडकी बहीण योजना सुरू होऊन २२ महिने उलटले आहेत. या २२ महिन्यांत या ८१ लाख » पान ७ वर

## दिलीप वळसे-पाटलांनीही शरद पवारांची भेट घेतली

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेस अजित पवार गटाचे नेते दिलीप वळसे पाटील यांनी आज मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानी शरद पवार यांची भेट घेतली. काही दिवसांपूर्वी अजित पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस प्रफुल्ल पटेल यांनी स्वतंत्रपणे शरद पवार यांची भेट घेतली होती. आता वळसे-पाटील यांच्या रुपाने अजित पवार गटातील आणखी एका नेत्याने शरद पवार यांची भेट घेतल्याने चर्चेला उधाण आले. वळसे-पाटील हे शरद पवार यांचे निकटवर्तीय मानले जातात. » पान ७ वर



## सेन्सॉर बोर्डाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे निधन

■ मुंबई

**बॉलिवूडमधील** ख्यातनाम चित्रपट निर्माते आणि चित्रपट परिनिरीक्षण मंडळाचे (सेन्सॉर बोर्ड) माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. यकृताशी संबंधित लिव्हर सोरायसीस या विकाराने ते त्रस्त होते. त्यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या पश्चात पत्नी नीता आणि तीन मुलगे विशाल, दीपेश आणि चिराग असा परिवार आहे.

निहलानी यांनी वयाच्या चौदाव्या वर्षी चित्रपट वितरक म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. १९७५ मध्ये त्यांनी स्वतःची चित्रपट वितरण कंपनी सुरू केली. त्यानंतर ते चित्रपट निर्मितीकडे वळले. पहलाज निहलानी हे हिंदी चित्रपटसृष्टीतील एक दिग्गज व्यक्तिमत्व होते. चित्रपट निर्माते म्हणून आणि सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष म्हणून त्यांची कारकीर्द चांगलीच गाजली.


ते २०१५ ते २०१७ या काळात सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात सेन्सॉर बोर्डाने घेतलेले अनेक निर्णय चर्चेत राहिले. त्यामुळे ते बोर्डाच्या सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या अध्यक्षांपैकी एक ठरले. २०१७ मध्ये प्रदर्शित » पान ७ वर

## नीट परिक्षार्थी आकांक्षाच्या आत्महत्येने राजकीय खळबळ

**नीट परीक्षा देऊन डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणारी १८ वर्षीय आकांक्षा चतुर्वेदी हिच्या आत्महत्येने देशभरात खळबळ उडाली आहे. पेपरफुटीच्या आरोपांमुळे आणि पुनर्परीक्षेच्या अनिश्चिततेमुळे ती मानसिक तणावाखाली गेल्याचा दावा कुटुंबियांनी केला आहे. यावरून काँग्रेस नेते राहुल गांधी, आपचे नेते अरविंद केजरीवाल आणि तृणमूल काँग्रेसने केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे.**

■ नवी दिल्ली

**आकांक्षा** मध्य प्रदेशातील मऊगंज जिल्ह्यातील मगेनिया गावची रहिवासी होती. तिचे वडील कृष्णकुमार चौबे हे अल्पभूधारक शेतकरी आहेत. आपल्या लाडक्या मुलीच्या शिक्षणासाठी त्यांनी स्वतःच्या क्षमतेपेक्षा जास्त आर्थिक जोखीम पत्करली होती. शेतीतून मिळणारे उत्पन्न तुटपुंजे असल्याने, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि आकांक्षाच्या कोचिंगची फी भरता यावी म्हणून ते नागपुरात एका ठिकाणी स्वयंपाकी म्हणून काम करत होते. आकांक्षाच्या अभ्यासाचा खर्च भागवण्यासाठी कुटुंबाने 'किसान क्रेडिट कार्डद्वारे सुमारे ३ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. इतकेच नव्हे तर, इतर नातेवाईकांकडूनही त्यांनी आर्थिक मदत घेतली होती.आकांक्षाचे काका जगदीश प्रसाद चतुर्वेदी यांनी सांगितले की, नीट परीक्षा दिल्यानंतर आकांक्षा खूप आनंदात होती आणि तिला ६५० पेक्षा जास्त गुण मिळतील असा आत्मविश्वास होता. मात्र, पेपरफुटी आणि गैरव्यवहाराच्या बातम्या सुरू झाल्यानंतर ती मानसिक तणावाखाली गेली. तिने जेवण कमी केले, लोकांशी बोलणे टाळले आणि आपल्या मेहनतीचे फळ वाया जाईल, या भीतीने ती खचून गेली होती. तिच्या मृत्यूनंतर कुटुंबियांना तिच्या पुस्तकात एक चिठ्ठी » पान ७ वर



LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

या प्रतिमेतून एलआयसी एजंट शोधा



तुम्ही शोधूच शकणार नाही
कारण ती कुटुंबातीलच एक व्यक्ती आहे...

आजच आमच्या एजंटशी संपर्क साधा, जो तुमचा कुटुंबातील मित्रासारखा आहे, आणि जीवन विमा तुमच्या आर्थिक उद्दिष्ट्यांच्या पूर्ततेसाठी आणि नियोजित निवृत्ती साध्य करण्यात कशी मदत करू शकतो याबद्दल चर्चा करा.

LIC/P1/2025-26/34/Mar

क्यूआर कोड स्कॅन करा आणि My LIC App डाऊनलोड करा

भेट द्या: licindia.in

कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827

आमचा व्हाट्सॲप नं. 8976862090 बोला 'Hi'

आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512

नवाकाळ

Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

अनुभवी मुले पाहिजेत, सत्राप्लाझा, वाशी येथे. हाऊसकीपींग, पे आणि पार्किंग, प्लंबर, इलेक्ट्रिशियन, गवंडी, वेल्डर, कारपेन्टर, सीसीटीव्ही, सिक्युरीटी. **8369729052** {NC260763}

गोरेगाव पूर्व येथे व्हेज/नॉनव्हेज रेस्टॉरंटसाठी कर्मचारी पाहिजेत किचन मोरी स्टाफ, वेटर्स, किचन हेल्पर्स टेबल क्लिनिंग बॉय, डिलीव्हरी बॉय, सेमी किचन शेफ, फूड पार्सल पॅकींग स्टाफ, कॅशियर/बिलिंग एक्झिक्युटिव्ह. संपर्कः **9833119998** {NC260769}

१) क्लार्कच्या कामासाठी चांगले अक्षर असलेली रिटायर्ड व्यक्ती पाहिजे. २) क्लार्कच्या कामासाठी कॉम्प्युटरची माहिती असलेली महिला पाहिजे. ३) चारचाकी सुपर कॅरीसाठी ड्रायव्हर पाहिजे. भेटा- आशिर्वाद टायर सर्व्हिस, ९ गोकुळदास पास्ता रोड, चित्रा सिनेमाच्या बाजुला, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४. {NCC260021}

नामांकित कंपनीत खालील पदे भरणे आहे. अकाऊन्टट (टॅली, वर्ड, एक्सेल) आवश्यक. सुपरवायझर, प्लंबर, वेल्डर, ड्रायव्हर, हेल्पर. भेटा-३०, सर्वोदया ट्रस्ट बिल्डिंग, गोखले रोड साऊथ, पोर्तुगीज चर्चजवळ, दादर (वेस्ट) {NC260789}

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुली पाहिजेत. दहिसर ईस्ट, संपर्क **7021374861** {NC260715}

P Square Pest Control मध्ये मुले/मुली पाहिजेत. दादर **9820548338/** कांजुरमार्ग **9920548406** {NC260760}

मालाड- सराऑगी हॉस्पिटलमध्ये बाई आणि नर्स पाहिजेत. पगार अनुभवानुसार.- **9372179410/8169717250/8850941620** {NC260796}

## पाहिजेत

मुंबई सेंट्रल येथील नामांकीत सोसायटीसाठी सिक्युरिटी सुपरवायझर- पगार ₹22,000/- सिक्युरिटी गार्ड- पगार ₹20,000/- ड्युटीः 8 तास, साप्ताहिक सुट्टी, PF व ESIC सुविधा संपर्कः **8591979285/ 8591979289.** पत्ताः G9, सिक्युरिटी फोर्स त्रिवणी सदन, 1st, करीरोड (पूर्व), मुंबई- 400012. {NC260749}

पाहिजेतः- टेलिकॉम इंजिनियर, इलेक्ट्रिशियन, फिटर, वेल्डर, बार बाइंडर, सिव्हिल हेल्पर, कॉन्ट्रॅक्टर. ई-मेलः pathakenterprises@gmail.com - **7718042290 / 932315757** {NC260737}

अंधेरी ईस्टमध्ये कुरीयर कंपनीसाठी पिकअप बॉय पाहिजेत. ॲशियानेट लॉजिस्टिक- **8097449888** {NC260718}

थ्री व्हिलर टेम्पो चालवणारे- मालाची डिलीव्हरी करण्यासाठी ड्रायव्हर कम डिलीव्हरी बॉय पाहिजेत. कामाची वेळ १० ते ६. (कांदिवली). **7221072107.** {NC260692}

लेथ मशीन टर्नर, ड्रिलिंग टॅपिंग व हॅंडप्रेस पॉवरप्रेस मेटलशीट व मेटल बफिंग, बेंडिंग व प्लास्टिक इंजेक्शन मोल्डिंग मशीनचे हुशार कारागीर, हेल्पर मुले/मुली व एम्ब्रोडरी मशीन ऑपरेटर पाहिजेत. २४० शांती इंडस्ट्रियल इस्टेटजवळ, तांबे नगर, एसएन रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई - 400080. दिलीप पांचाळ **9221232176** {NC260684}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे आकर्षक पगार (मालाड वेस्ट)- **9136731541** {NC260790}

**दादर येथील दुकानाकरिता हेल्पर पाहिजे. पगार 17000/- महिना. मालक- 9967297770** {NC260799}

## पाहिजेत

शाळेसाठी सुरक्षा रक्षक पाहिजेत. अर्ज/आधार कार्ड सहित भेटा! घाटकोपर, कुर्ला, विक्रोळी, साकीनाका भागातील उमेदवारांना प्राधान्य. सनग्रेस इंग्लिश स्कूल १, मिलिंद नगर, हिमालय सोसायटी, असल्फा मेट्रो स्टेशनजवळ, घाटकोपर (प.) मुंबई-८४. भेटण्याची वेळः दुपारी ३ ते ४. {NC260800}

मालाडमध्ये हॅन्डप्रेसच्या कामासाठी मुले / मुली पाहिजेत प.18000/- **9833730360** {NC260767}

भांडूप येथे सीडी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर, पंचिंग ऑपरेटर, बाईंडर पाहिजे. संपर्कः **9820930362/ 9930589715** {NC260801}

पेशंटकेअरसाठी आया, बाई, पुरुष त्वरित पाहिजेत. संपर्कः **9321205984** {NC260803}

## Situation Vacant

GAURI ENTERPRISES Requires Female Office Staff. 12th. Goregaon. **9321366513**. {NC260776}

REQD. Office Boy Santacruz. Whatsapp **9820098103**, kajariaclasses@gmail.com {NC260804}

Required male/female staff experience in Tally, MS Office, e-tendering Dombivli East. Contact:- **8286761878** {NC260802}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260552}

## व्यसन मुक्ती

दारू सोडवा : दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट, औषधे उपलब्ध. डॉ., नागरगोजे- **9765609769** {NC260716}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# निवडणूक बिनविरोध करण्यासाठी महायुतीची धावपळ

पान १ वरून

राणे यांच्यासोबत बाळ माने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. सूचक म्हणून माझ्या अर्जावर महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या सह्या मिळाल्या नाहीत. मविआतील घटक पक्षाकडून मला कोणतीही साथ मिळाली नाही. त्यामुळे नाईलाजाने मला निर्णय घ्यावा लागला. शिवाय मला घोडे बाजार टाळायचा होता. त्यामुळेही मी या निवडणुकीतून माघार घेतली आहे, असे बाळ माने म्हणाले. परंतु या निर्णयानंतर नाराज झालेल्या उबाठाने ताबडतोब त्यांची पक्षातून हकालपट्टी केली. याचा परिणाम असा झाला की, सुनील तटकरे यांचे पुत्र अनिकेत तटकरे बिनविरोध विधानपरिषदेवर निवडून गेले.

ठाण्यातही आज नाट्यमय घडामोड घडली. या मतदारसंघात शिंदे सेनेचे रवींद्र फाटक यांना शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे अभिजीत पवार यांनी आव्हान दिले होते. ते फाटक यांच्या विरोधातील एकमेव उमेदवार होते. आज त्यांनी अचानक माघार घेतली. त्यांनी आपण वैयक्तिक कारणासाठी माघार घेत असल्याचे सांगितले. परंतु महायुतीकडे ७९० आणि महायुतीकडे केवळ १३० मते होती. त्यामुळे त्यांनी माघार घेतली, असे म्हटले जात आहे.

पुणे मतदारसंघात भाजपातून ऐनवेळी अजित पवार गटात प्रवेश करून तिकीट मिळवलेले माजी खासदार संजय काकडे यांचे पुत्र विक्रम काकडे यांच्या विरोधात भाजपाचे प्रदीप कंद आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे बंडखोर सुनील टिंगरे यांनी उमेदवारी केली होती. या दोन्ही बंडखोरांना पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी माघार घ्यायला लावली. या मतदारसंघात मविआकडून निवडणूक लढणारे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार श्रीकांत पाटील यांनीही उमेदवारी अर्ज मागे घेतला. संजय काकडे आणि सुनेत्रा पवार यांनी शरद पवारांना फोन करून पाटील यांच्या माघारीची विनंती केली. त्यानंतर शरद पवार यांनी पाटील यांना अर्ज मागे घ्यायला लावला, असे म्हटले जात आहे. यामुळे विक्रम काकडे यांची बिनविरोध निवड झाली.

यवतमाळमध्ये शिंदे गटाचे उमेदवार दुष्यंत चतुर्वेदी यांच्याविरोधात मविआचे काँग्रेसचे उमेदवार साहेबराव कांबळे यांनी माघार घेतली. त्यामुळे संतापलेल्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या फोटोवर नकली नोटांची उधळण केली. या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बंडखोर उमेदवार साजिद बेग आणि भाजपाचे बंडखोर उमेदवार नितीन भुतडा यांनीही अर्ज मागे घेतले.

चंद्रपूर मतदारसंघात सुप्रिया सुळे यांचे व्याही आणि भाजपाचे उमेदवार अरुण लाखाणी यांच्याविरोधात काँग्रेसच्या शैलेशकुमार अग्रवाल यांनी माघार घेतली. त्यामुळे लाखाणी यांचा बिनविरोधचा मार्ग मोकळा झाला.

अहिल्यानगरमध्ये शरद पवार गटाचे खासदार नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके निवडणूक लढणार असल्याची घोषणा केली होती. परंतु त्यांनी अर्ज भरलाच नाही. आज सर्व अपक्षांनी माघार घेतल्याचे सांगण्यात आले. परंतु दत्तात्रय पानसरे या अपक्ष उमेदवाराने असा आरोप केला की, माझ्या परवानगी आणि सहीशिवाय माझा अर्ज मागे घेण्यात आला.

छत्रपती संभाजीनगरमध्ये उबाठाच्या देवयानी डोणगावकर यांनी भाजपाच्या सुहास शिरसाट यांच्या विरोधात अर्ज भरला होता. त्यांनीही आज शेवटच्या दिवशी माघार घेतली. पक्षाकडे विनंती करूनच अर्ज मागे घेतला, अशी माहिती देवयानी यांचे पती कृष्णा डोणगावकरांनी दिली. त्यांनी असा आरोप केला की, देवयानी डोणगावकरांचा अर्ज दाखल केल्यानंतर गंगापूर साखर कारखान्याची समिती बरखास्त करण्याची मला नोटीस मिळाली. भाजपाने दबाव टाकण्यासाठी मला नोटीस पाठवली. मी त्या नोटिशीला घाबरत नाही. पण आहे ते घालवायचे नाही म्हणून माघार घेत आहे.

देवयानी डोणगावकर त्यांचा अर्ज माघार घेणार याची कुणकुण आधीच ठाकरे गटाला लागली होती. त्यामुळेच ठाकरे गटाकडून गणेश लोखंडे यांचाही अपक्ष अर्ज दाखल करण्यात आला होता. देवयानी यांनी त्यांचा अर्ज माघार घेतल्यानंतर महाविकास आघाडीने गणेश लोखंडे यांना त्यांचा अधिकृत उमेदवार म्हणून घोषित केले आहे, तर देवयानी व कृष्णा डोणगावकर यांची पक्षातून हकालपट्टी केली, याच मतदारसंघात शिंदे गटाचे अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार यांनी बंडखोरी केली होती. त्यांनीही आज माघार घेतली. समीर सत्तारांना आता जिल्हा बँकेवर संधी देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

विशेष म्हणजे या निवडणुकीत नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, छत्रपती-संभाजीनगर-जालना, भंडारा-गोंदिया या मतदारसंघात मविआचा उमेदवारच रिंगणात नसल्याने इथली निवडणूक महायुतीसाठी एकतर्फी झाली आहे. तरीही १२ ठिकाणी निवडणूक होणार आहे.

**पुणे विधान परिषदेसाठी ६० कोटींची डील! रोहित पवारांचा आरोप**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी या निवडणुकीसाठी ५० ते ६० कोटी रुपयांचा आर्थिक व्यवहार झाल्याचा दावा केला. या आरोपामुळे खळबळ उडाली आहे.

रोहित पवार म्हणाले की, राज्यातील अनेक ठिकाणी उमेदवारीसाठी पैशांचे व्यवहार झाल्याची चर्चा आहे. पुण्यातील जागेसाठीही मोठी आर्थिक डील झाल्याची माहिती आहे. यासाठी ५० ते ६० कोटी रुपये देऊन उमेदवारी मिळाल्याची चर्चा आहे. पुण्यातल्या उमेदवारांना पैसे घेऊन उमेदवारी दिली. अनेक उमेदवार घाबरत आहेत, म्हणून माघार घेत आहेत. उमेदवार आपण सगळीकडे उभे केले आहेत.

मात्र भाजपा आणि महायुतीकडून पैशाचा मारा केला जात आहे. सोलापूरमध्येदेखील उमेदवाराला पैसे दिले. सरकार घोडा बाजार करत आहे. गलिच्छ पातळीवर राजकारण करत आहेत. भाजपा आणि मित्र पक्षांकडून करोड रुपये दिले जात आहे. राज्यात महायुतीने असे काही उमेदवार दिले आहेत. त्यांच्याकडे खूप पैसे आहेत. अनेक बाहेरून आलेल्या लोकांना उमेदवारी दिली. या माणसाने अजित पवारांवर खालच्या पातळीवर जाऊन विधान केले होते, हे सगळे भयानक आहे. आमचे प्रामाणिक कार्यकर्ते लढायला इच्छुक आहेत.

## आमचा बाप काढला, शिवीगाळ केली नाशिकमध्ये गोकुळ गीतेंची माघार नाहीच

पान १ वरून

गेल्या दोन-तीन दिवसांपासून मंत्री गिरीश महाजन, मंत्री दादा भुसे, उदय सामंत तसेच महायुतीतील अन्य वरिष्ठ नेत्यांचे प्रयत्न सुरू होते. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनीही यासंदर्भात चर्चा केली. या मध्यस्थीमुळे गणेश गीते यांनी अरवेर माघार घेतली. गोकुळ गीते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. गोकुळ गीते यांच्या भावाने त्यांना फोन करून माघार घेण्याची विनंती केली. पण गोकुळ गीते यांनी आरोप केला की, कुणाल दराडे याने संपर्क साधून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. आमचा बाप काढला. अशा प्रकारची भाषा आणि दबाव टाकला जात असेल, तर मी कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नाही. हा वाद मुंबईपर्यंत पोहोचल्याने मंत्री गिरीश महाजन यांनी स्वत: या प्रकरणात लक्ष घातले. त्यांचे निकटवर्तीय मानले जाणारे नाशिकचे नेते निलेश बोरा हेही गेल्या दोन दिवसांपासून मुंबईत तळ ठोकून होते. अर्ज माघारीच्या दिवशी निलेश बोरा आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यात सातत्याने चर्चा सुरू होती. पण अर्ज मागे घेण्यासाठी अवघी १० मिनिटे शिल्लक असतानाही गोकुळ गीते यांच्याशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू होते. पण गोकुळ गीते यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे नाशिकच्या राजकीय वर्तुळात नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे.

## भंडाऱ्याला शुद्ध हळद म्हणून जाहीर करा! विक्रम पाचपुतेंची मुंढेंकडे मागणी

मुंबई

**राज्यातील** प्रमुख देवस्थानांमध्ये विक्री होणाऱ्या भेसळयुक्त आणि रासायनिक भंडाऱ्याच्या प्रश्नावर भाजपा आमदार विक्रम पाचपुते यांनी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांची भेट घेऊन महत्त्वाची मागणी केली आहे. भंडारा म्हणजे शुद्ध हळद अशी अधिकृत घोषणा करण्यात यावी, असे निवेदन त्यांनी मुंढे यांना दिले.

पाचपुते यांनी दिलेल्या निवेदनानुसार, महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जेजुरी गडासह विविध देवस्थान परिसरात मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त आणि केमिकलयुक्त भंडाऱ्याची विक्री होत असल्याच्या तक्रारी आहेत. यामुळे भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून धार्मिक श्रद्धेलाही धक्का पोहोचत आहे. सध्या अन्न व औषध प्रशासनाकडे भंडारा या संकल्पनेची स्पष्ट किंवा कायदेशीर व्याख्या नसल्याचा गैरफायदा काही विक्रेते घेत आहेत. कायद्यात भंडारा म्हणजे हळदच, असे स्पष्ट नमूद नसल्याने काही ठिकाणी रासायनिक रंग, ज्वलनशील पदार्थ आणि इतर घटक मिसळून भंडाऱ्याची विक्री केली जात असल्याचे पाचपुते यांनी निदर्शनास आणून दिले.

## मनोज जरांगे यांना रुग्णालयातून डिस्चार्ज

**छत्रपती संभाजीनगर** - मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांना छत्रपती संभाजीनगर येथील गॅलक्सी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले की, त्यांच्यात अजूनही अशक्तपणा असल्यामुळे त्यांनी घरी ८ ते १० दिवस आराम करणे गरजेचे आहे. मराठा आरक्षणाबाबत ३० मे रोजी जरांगे यांनी जालन्यातील अंतरवाली सराटीत कडक उन्हात आमरण उपोषण सुरू केले होते. सरकारच्या शिष्टमंडळाने मध्यरात्री सकारात्मक चर्चा केल्यानंतर आणि मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी आपले आमरण उपोषण मागे घेतले होते.

## महागाईविरोधात बारामतीत युगेंद्र पवारांच्या नेतृत्वात आंदोलन

बारामती

**वाढती** महागाई, पेट्रोल-डिझेल आणि घरगुती गॅसच्या दरवाढीसह कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसने बारामतीत आज जोरदार आंदोलन छेडले. युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

बारामतीतील तीन हत्ती चौक परिसरात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी महागाईविरोधी व शेतकरी समर्थक घोषणा देत केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली. कांद्याला भाव मिळालाच पाहिजे, शेतकऱ्याला न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणा दिल्या. आंदोलनादरम्यान महिलांनी रस्त्यावर चूल मांडून भाकरी थापत वाढत्या महागाईकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. तर युगेंद्र पवार यांच्यासह कार्यकर्त्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घातल्या होत्या.

## कॉकरोच पार्टीच्या अभिजित दीपकेला अमेरिकेतून हद्दपार केल्याची चर्चा

पान ८ वरून

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे नीट, सीबीएससी परीक्षा घोटाळ्याप्रकरणी राजीनामा मागितला आहे. यासाठी त्याने तरुणांना नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे होणाऱ्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहनही केले. यावरून वातावरण तापले असतानाच शायन कृष्णा याने अभिजीत दीपकेला अमेरिकेतून हद्दपार करण्यात आल्याचा दावा केला. त्याच्या मते, त्याचे भारतात परतणे स्वेच्छेने नसून कायदेशीर कारवाईचा परिणाम आहे. मात्र, या दाव्याला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. दोन आठवड्यांपूर्वी अभिजितचा तात्पुरता व्हिसा होता त्याने राजकीय वक्तव्य केली म्हणून त्याला अमेरिका सोडणे भाग पडणार असल्याचे म्हटले होते. यावर कॉकरोच पार्टीच्या समर्थकांनी हद्दपारीच्या अफवा पसरवून आंदोलनाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप केला. तर स्वत: अभिजित दीपकेने एक्सवर शायनचा व्हिडिओ दिशाभूल करण्याचा चांगला प्रयत्न असल्याचे म्हणत खोट्या बातम्यांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

## आजचे राशी भविष्य

शुक्रवार ता. ५ जून २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | आर्थिक लाभ होतील. नोकरीत नवीन संधी चालून येतील. वास्तुसंबंधित कामांमध्ये यश मिळेल. |
| वृषभ | कामानिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. भावंडांचे सहकार्य लाभेल. आर्थिक चिंता मिटतील. |
| मिथुन | अचानक धनलाभाचे योग. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. पाहुणे मंडळींच्या गाठीभेटी होतील. |
| कर्क | मनात आनंदी विचार राहतील. शुभ घटना घडतील. कार्यक्षेत्रात सफलता मिळेल. |
| सिंह | व्यवसायविस्ताराच्या योजना आखाल. सहकाऱ्यांची साथ लाभेल. मात्र काही कामांमध्ये अडचणी निर्माण होतील. |
| कन्या | सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. मोठ्या लोकांच्या ओळखी वाढतील. जोडीदाराशी मतभेद टाळावेत. |
| तूळ | महत्त्वाच्या कामांमध्ये सफलता मिळेल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. जोडीदाराची साथ लाभेल. |
| वृश्चिक | दूरच्या प्रवासाचे योग येतील. नोकरीत कामाचा ताण वाढेल. संततीची प्रगती होईल. |
| धनु | योजलेल्या कामांमध्ये अचानक अडचणी उद्भवू शकतात. खाण्याची पथ्ये सांभाळा. नोकरीत सहकाऱ्यांशी पटवून घ्यावे लागेल. |
| मकर | नोकरीत वरिष्ठ खुश राहतील. वैवाहिक जीवनात गोडवा राहील. वडिलोपार्जित मालमत्तेसंबंधी कामे मार्गी लागतील. |
| कुंभ | अधिक परिश्रमाने यश मिळवाल. आर्थिक व्यवहार जपून करावेत.भावनेच्या भरात कोणालाही शब्द देऊ नका. |
| मीन | योजलेली कामे वेळेत पूर्ण होतील. मित्रमंडळींच्या भेटीगाठी होतील. चमचमीत भोजनाचा आस्वाद घ्याल. |

## शुभ राशी ता. ५/६/२०२६

| | | |
|---|---|---|
| ९ | १ | ६ |
| ९२ | १२ | ६२ |
| ९८ | १७ | ६७ |
| १८० | १४६ | १६९ |
| ५६८ | ३८० | ३५८ |

## लॉटरी

### महाराष्ट्र आकर्षक पुष्कराज विकली लॉटरी

सोडत दर गुरुवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 23 • सोडत दिनांक 04/06/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **AP-03 : 7958**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी **7958** — महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर, श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **5027** — कपिल असोसिएट्स - कोल्हापूर

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0548 | 0771 | 2018 | 2107 | 2551 | 3651 | 5665 | 7472 | 8289 | 9123 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1298 | 3453 | 3479 | 4197 | 4335 | 4598 | 4813 | 5639 | 7838 | 8731 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0113 | 1295 | 1387 | 1471 | 3701 | 5067 | 6427 | 7337 | 8036 | 9638 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0525 | 0733 | 0773 | 1695 | 3098 | 4049 | 5970 | 7451 | 8702 | 9441 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

0003 0006 0008 0019 0023 0031 0049 0062 0063 0066 0069 0085 0089 0090 0091 0145 0171 0193 0195 0197 0199 0200 0203 0253 0264 0294 0309 0328 0355 0375 0423 0451 0452 0493 0504
0505 0513 0518 0520 0533 0549 0550 0611 0650 0660 0665 0675 0694 0710 0727 0737 0751 0772 0805 0855 0886 0903 0975 0985 1013 1021 1031 1058 1096 1098 1105 1114 1118 1130 1131
1137 1139 1140 1148 1153 1160 1162 1164 1167 1187 1191 1204 1214 1223 1272 1316 1391 1414 1473 1495 1510 1526 1531 1565 1598 1602 1618 1634 1711 1741 1749 1788 1800 1815 1827 1846 1903 1910 1916 1917
1995 2019 2022 2028 2031 2039 2050 2062 2082 2083 2094 2119 2122 2131 2163 2170 2174 2206 2207 2210 2224 2241 2243 2248 2277 2290 2297 2331 2364 2377 2383 2411 2425 2427 2442 2462 2465 2483 2492 2523
2538 2571 2632 2681 2724 2732 2819 2822 2834 2835 2860 2867 2868 2904 2932 2952 2959 2972 2976 2992 3005 3021 3093 3102 3161 3233 3237 3247 3250 3265 3288 3294 3303 3309 3313 3324 3344 3370 3388 3396
3423 3436 3466 3483 3493 3522 3581 3583 3633 3639 3653 3703 3717 3749 3762 3806 3808 3821 3837 3839 3885 3907 3913 3919 3933 3996 4088 4119 4124 4200 4210 4215 4224 4227 4250 4274 4327 4336 4346 4362
4394 4403 4411 4414 4415 4418 4420 4421 4422 4435 4440 4464 4478 4485 4501 4508 4538 4577 4578 4606 4610 4614 4624 4644 4665 4674 4682 4748 4752 4774 4804 4805 4826 4833 4854 4894 4897 4898 4908 4943
4959 5009 5019 5022 5035 5046 5048 5054 5075 5090 5091 5095 5102 5107 5136 5169 5195 5201 5202 5222 5241 5245 5325 5356 5359 5375 5385 5396 5434 5442 5448 5471 5477 5490 5495 5496 5535 5538 5584 5593
5599 5627 5670 5671 5696 5697 5741 5745 5789 5810 5859 5955 6001 6014 6039 6071 6105 6160 6169 6175 6199 6208 6242 6266 6267 6283 6296 6300 6305 6353 6371 6420 6446 6456 6464 6465 6473 6485 6535 6564
6597 6606 6611 6612 6617 6621 6628 6640 6642 6643 6651 6668 6671 6673 6676 6691 6696 6725 6753 6761 6766 6810 6819 6822 6832 6843 6854 6879 6880 6908 6919 6920 6937 6950 6977 7027 7035 7048 7078 7142
7147 7159 7171 7177 7200 7207 7217 7247 7267 7283 7291 7313 7317 7329 7337 7339 7359 7370 7379 7383 7397 7401 7435 7469 7472 7477 7506 7515 7547 7573 7575 7579 7581 7588 7593 7610 7646 7657 7718 7726
7727 7736 7790 7792 7793 7806 7822 7826 7830 7863 7869 7947 7991 8011 8024 8035 8043 8098 8111 8122 8181 8182 8187 8221 8262 8284 8401 8444 8480 8495 8497 8498 8515 8540 8550 8575 8608 8626 8637 8648
8655 8662 8687 8704 8728 8781 8783 8802 8815 8816 8823 8827 8828 8862 8881 8883 8886 8887 8888 8895 8911 8925 8944 8963 8968 8980 8992 9001 9014 9051 9059 9077 9081 9084 9088 9098 9099 9124 9182 9189
9195 9227 9298 9322 9374 9399 9420 9443 9444 9468 9497 9503 9533 9551 9573 9582 9590 9626 9642 9668 9669 9704 9709 9720 9722 9743 9765 9771 9813 9859 9869 9884 9892 9910 9926 9929 9934 9974 9978 9999

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

### गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता • सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 23 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 04/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-08 : 9561** — महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **0081**

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **3834**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0418 | 0596 | 0960 | 1908 | 4007 | 7584 | 7961 | 8187 | 8765 | 9441 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0385 | 1228 | 1538 | 2670 | 2694 | 4215 | 5148 | 6390 | 8202 | 9843 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0517 | 0872 | 1866 | 2091 | 3047 | 7386 | 7725 | 8025 | 8366 | 8680 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

0000 0001 0017 0041 0048 0108 0267 0400 0412 0461 0480 0553 0600 0702 0745 0807 0856 0912
0952 1052 1115 1117 1148 1218 1248 1386 1413 1419 1453 1516 1598 1602 1652 1672 1734 1811
1851 1857 1880 1971 2118 2128 2209 2217 2272 2432 2455 2492 2530 2531 2628 2679 2691 2729 2770 2873 2882
2921 2928 2968 3021 3027 3136 3151 3262 3293 3303 3343 3356 3395 3398 3411 3436 3462 3613 3680 3743 3753
3796 3837 3886 3925 3935 3973 4014 4030 4048 4063 4083 4135 4148 4176 4322 4325 4343 4344 4349 4436 4437
4484 4506 4519 4563 4640 4809 4901 5045 5074 5225 5311 5355 5357 5445 5492 5510 5537 5560 5568 5599 5635
5645 5650 5659 5685 5776 5864 5890 5912 5916 6183 6209 6214 6257 6264 6309 6312 6390 6457 6464 6473 6520
6522 6639 6666 6693 6697 6713 6717 6802 6866 6872 6876 6965 7061 7176 7209 7217 7271 7273 7293 7335 7387
7440 7487 7568 7617 7671 7714 7731 7735 7759 7778 7784 7797 7870 7968 7993 8080 8081 8088 8091 8283 8481
8485 8492 8509 8584 8622 8656 8686 8725 8743 8829 8858 8868 8883 8958 8982 8987 9010 9035 9089 9093 9094
9095 9169 9219 9298 9311 9429 9449 9498 9519 9547 9568 9569 9572 9605 9612 9804 9878 9899 9912 9919 9965

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

### महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री • दीपलक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता • सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 23 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 04/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SD-00 : 2951**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1288 | 1387 | 3473 | 4768 | 4784 | 6189 किशोर लॉटरी सेंटर, सांगली | 6510 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 7373 | 8404 | 9251 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0027 | 0232 | 1448 | 1642 | 4690 | 5095 | 6959 | 7321 | 9027 | 9563 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0132 | 1538 | 1727 | 2259 | 4126 | 5696 | 7257 | 7760 | 7820 | 8064 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

0022 0060 0120 0125 0267 0580 0790 0792 0892 1099 1473
1476 1631 1777 1809 1838 1904 2112 2217 2219 2291 2412 2572 2773
2920 2975 2993 3038 3236 3243 3291 3307 3318 3319 3349 3432 3487
3539 3660 3713 3763 3923 3926 3975 3981 4105 4174 4245 4340 4375
4417 4446 4493 4499 4576 4647 4729 4849 5138 5140 5265 5300 5357
5466 5577 5584 5586 5729 5732 5795 5968 6151 6156 6280 6291 6816
6829 6962 7008 7210 7387 7483 7578 7631 7753 7799 7921 8113 8178
8186 8214 8248 8280 8418 8438 8480 8578 8622 8810 8863 8886 9011
9308 9334 9393 9428 9443 9491 9512 9592 9676 9685 9872 9933 9988

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

### महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता • सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 23 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 04/06/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-03 : 5231**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1406 | 1712 | 2581 | 5203 | 5294 | 6853 | 6994 | 9431 महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी | 9603 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 9812 श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0022 | 0511 | 1425 | 1517 | 3331 | 4366 | 4632 | 8028 | 9378 | 9983 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0230 | 0352 | 0994 | 1611 | 2335 | 3252 | 4523 | 4767 | 5976 | 8492 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0984 | 1207 | 1450 | 2273 | 2398 | 3329 | 3848 | 5496 | 5756 | 9691 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

0002 0003 0013 0054 0064 0085 0089 0102 0108 0221 0222 0240 0301 0309 0551 0568 0570 0600 0607 0641
0720 0974 0980 0991 1007 1015 1018 1107 1130 1154 1159 1178 1195 1343 1442 1635 1681 1750 1815 1817
1867 1869 1934 1993 2081 2121 2122 2133 2135 2153 2167 2174 2192 2202 2205 2210 2222 2226 2249 2273 2342 2668
2692 2718 2820 2827 2857 2878 2902 2926 3048 3081 3083 3133 3139 3163 3173 3207 3214 3287 3288 3311 3335 3340
3365 3376 3383 3385 3391 3412 3418 3490 3493 3548 3555 3586 3592 3594 3597 3661 3663 3667 3699 3722 3736 3803
3873 3935 3985 3999 4004 4026 4054 4059 4098 4102 4110 4143 4146 4247 4270 4299 4415 4421 4427 4489 4690 4710
4734 4746 4764 4834 4964 5052 5085 5148 5155 5169 5355 5357 5360 5373 5396 5418 5447 5459 5478 5523 5529 5541
5545 5555 5559 5563 5575 5662 5699 5805 5808 5995 6001 6067 6069 6203 6303 6348 6376 6395 6415 6433 6540 6563
6650 6657 6658 6671 6733 6756 6761 6763 6856 6917 6923 6941 6952 6964 7013 7021 7069 7151 7170 7196 7269 7276
7396 7473 7504 7507 7546 7563 7566 7627 7721 7769 7777 7866 7888 7979 8043 8053 8073 8081 8086 8146 8225 8349
8442 8513 8666 8685 8709 8751 8757 8826 8833 8855 8878 8885 8915 8930 9018 9050 9099 9198 9205 9228 9296 9297
9334 9341 9369 9431 9458 9496 9498 9511 9699 9746 9767 9804 9874 9900 9909 9913 9933 9938 9941 9980 9984 9988

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# आता वस्तूसेवा कर कमी करण्याची वेळ

एप्रिलपासून सुरू झालेले आर्थिक वर्ष बरेच अनर्थकारी ठरण्याची लक्षणे दिसत आहेत. अमेरिका, इराण युद्धानंतर जागतिक स्तरावर बदललेल्या परिस्थितीचे काही महत्त्वपूर्ण परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत आहेत. प्रामुख्याने इंधन टंचाई आणि त्यातून अनिवार्यपणे उद्‌भवलेली इंधनाची दरवाढ हे भारताच्या ग्रोथ इंजिनचा वेग मंदावेल की काय अशी परिस्थिती दिसते आहे. देशाच्या पंतप्रधानांनीच येणाऱ्या काळातल्या काही समस्यांची जाणीव करून दिलेली आहे. सरकार करीत असलेले प्रयत्न कदाचित पुरेसे ठरणार नाहीत किंवा सरकारच्या एकट्याच्या प्रयत्नावर परिस्थिती नियंत्रणात राहू शकणार नाही, याकरीता देशातील प्रत्येक नागरिकाचे सहकार्य पंतप्रधानांना गरजेचे वाटलेले दिसते. साधारणपणे गेल्या महिनाभरात अनेक वस्तूंची टंचाई आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीतली दरवाढ आपले रंग दाखवू लागलेली आहे. इंधन दरवाढीचे परिणाम केवळ जीवनावश्यक वस्तूपुरतेच मर्यादित राहात नाही तर त्याचा सर्वच क्षेत्रांवर हळुहळू परिणाम दिसू लागला आहे. येणारा पावसाळा त्यातला खरीपाचा हंगाम, जून पासून सुरू होणारे शैक्षणिक वर्ष या प्रमुख क्षेत्रांवर इंधन दरवाढीचे सावट घोंघावू लागलेले आहे. सरकार सर्वतो प्रयत्न करून खते, बी-बियाणे यांच्या किमती वाढणार नाहीत यासाठी प्रयत्न करीत आहेत. तरीदेखील काही ना काही प्रमाणात दरवाढ अटळ ठरते आहे. तर दुसरीकडे या शैक्षणिक वर्षात पाठ्यपुस्तकांपासून ते अनेक प्रकारच्या शैक्षणिक साहित्यातसुद्धा पाच दहा टक्क्यांची वाढ होऊ शकते. स्कूल बसेस संघटनांनी आताच पंधरा टक्के दरवाढ करण्याचे जाहीर केले. म्हणजेच वाढते शैक्षणिक शुल्क आणि शिवाय शैक्षणिक साहित्यातली दरवाढ असा दुहेरी भडीमार पालकांवर होऊ घातला आहे. या परिस्थितीचे कारण पुढे करून खाजगी शैक्षणिक संस्थासुद्धा आपला स्वार्थ साधून घेण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. कारण आज महाराष्ट्रातसुद्धा जवळपास साठ टक्के खाजगी शैक्षणिक संस्थांकडून शैक्षणिक साहित्य आणि त्यांच्याच स्कूल बसेसचा वापर करण्याची सक्ती केली जाते. संपूर्ण वर्षाचे लाख दीड लाख रुपये शुल्क घेतले जाते या शुल्कातील वाढीचेही संकेत मिळू लागले आहेत.

### काटकसरीचीच सरकारची कसोटी

येत्या वर्षभरामध्ये या सगळ्याच समस्यांची तीव्रता वाढतच जाईल. अशा परिस्थितीत सरकारने सुचवलेल्या काटकसरीच्या उपाययोजना आणि वाढती महागाई हा परस्पर विरोध अधिकच चिंता निर्माण करणारा ठरू शकतो. महागाई झाली की, आपोआपच काही वस्तूंच्या वापरावर मर्यादा येतात. परंतु ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत. ज्या वस्तूंना कोणतेही पर्याय नाहीत. त्याच्यामध्ये काटकसर करता येणेदेखील शक्य होत नाही. म्हणजेच अशा काही वस्तूंच्या संदर्भात सरकारने काही वेगळे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सामान्य जनतेच्या महिन्याच्या खर्चावर या इंधन दरवाढीने नियंत्रण आणायला सुरूवात केलेली आहे. परंतु त्यातून होत जाणारी महागाई ही सामान्यांचा खिसा रिकामा करणारी ठरते. महागाईही सहन करा आणि काटकसरही करा, अशा पद्धतीने सामान्यांना कात्रीत पकडण्याचा प्रयत्न होतो आहे. जर देशातील सामान्य माणसांच्या जनजीवनावर या गोष्टींचा फार परिणाम होऊ द्यायचा नसेल तर सरकारला स्वतः काटकसर करावी लागेल. ती काटकसर सरकारच्या उत्पन्नामध्ये किंवा महसूलामध्ये करता येऊ शकते. गेल्या तीन चार वर्षापासून सगळ्याच वस्तूंवरच्या वस्तू सेवाकरामध्ये वाढ होत गेली आणि दरवर्षी वस्तू सेवाकराचे उत्पन्न सतत काही हजार कोटींनी वाढत गेलेले आहे. सरकारने अगदी काटेकोरपणे जास्तीत जास्त वस्तू सेवाकराच्या अंतर्गत कशा येतील याचे नियोजन केले त्यात जीवनावश्यक अशा अनेक वस्तूंचा समावेश आहे. आता अशी वेळ आलेली आहे की, महागाई नियंत्रणात आणण्याबरोबरच केंद्र सरकारने लावलेल्या करामध्ये कपात करण्याची आवश्यकता आहे. तीन आठवड्यांपूर्वी इंधनावरच्या शुल्कात सरकारने कपात केली होती. तरीदेखील इंधनाचे दर विशेषतः पेट्रोल-डिझेलचे दर वाढतच असल्याने ते रोखून धरणे केंद्र सरकारलाही शक्य होण्यासारखे दिसत नाही. अशा परिस्थितीत किमान महागाई नियंत्रणात आणण्याकरीता जर वस्तू सेवाकरामध्ये कपात केली तर किमती नियंत्रणात राहू शकतील. म्हणजे सामान्य माणसाच्या महिनाभराच्या खर्चाचा ताळमेळ ठेवता येऊ शकेल.

### सर्वाधिक झळ सामान्यांनाच

वस्तू सेवाकरातून केंद्राला आतापर्यंत विक्रमी महसूल मिळालेला आहे. त्यातला काही वाटा हा राज्य सरकारांना दिला जातो. म्हणजेच राज्य सरकारांना मिळणाऱ्या हिस्स्यावरही परिणाम होऊ शकेल. थोडक्यात केंद्र आणि राज्य सरकारांना मिळणाऱ्या महसूलात कपात होईल. ही कपात झाल्यावर अनाठायी होणारे सरकारी खर्चदेखील नियंत्रणात राहातील म्हणजे तिथे आपोआपच काटकसर होऊ शकेल. संभाव्य परिस्थितीचा विचार केला तर टंचाई आणि महागाई या कचाट्यातून दिलासा मिळण्याकरीता हा एक पर्याय ठरू शकतो. वस्तू सेवाकराचे ओझे कमी झाले. तर वस्तूंच्या किमती आपोआप खाली येऊ शकतील. परंतु दुर्दैवाचा भाग असा आहे की, सरकार लोकांना काटकसर करायला सांगते आहे. मुळातच मर्यादित उत्पन्न असलेला सामान्य माणूस काटकसर करूनच जीवन जगत असतो. आता खरी काटकसर करण्याची कसोटीची वेळ केंद्र आणि राज्य सरकारवर आलेली आहे. अगदी तेल कंपन्यांना होणारा भरमसाठ नफा अशा परिस्थितीत लक्षात घ्यावा लागेल आणि खर्च भरून निघेल एवढ्याच उत्पन्नाची अपेक्षा ठेवून तेल कंपन्यांनादेखील आपल्या नफ्यात काटकसर करावी लागेल. सरकारने देशभरातल्या साठ ते सत्तर टक्के सामान्य मध्यमवर्गीय माणसाचा विचार करायला हवा. कारण या इंधनदरवाढीच्या परिणामांची झळ याच वर्गाला बसते. जसे शैक्षणिक साहित्यातल्या किंमतवाढीपासून ते रिक्षा-बसच्या भाडेवाढीपर्यंतचे चटके सहन करावे लागतात.


## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

निर्णय घेताना नेहमी मेंदूचं ऐकावं
आणि नाती निभावताना मनाचं,
कारण मेंदू व्यावहारिक तर मन हे भावनिक असतं.

## पंचांग

**शुक्रवार, ५ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ कृष्ण पंचमी**
**नक्षत्र : श्रवण**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मकर**



**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-१३**

श्री. मा.स. गोळवलकर गुरुजी स्मृतिदिन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### गोवन स्टाईल भरलो बांगडो



★ **साहित्य :** ६ बांगडे, १ लिंबाचा रस, १ कप ओलं खोबरं, १ टेबलस्पून धणे, १ टीस्पून काळिमिरी, ४ हिरव्या मिरच्या, आलं १ इंच, लसूण ८-१० पाकळ्या, १/२ वाटी कोथिंबीर, ४ कोकम, मीठ चवीनुसार, २ टेबलस्पून लाल तिखट, १/२ टीस्पून हळद, १ टीस्पून गरम मसाला, १/२ कप रवा, १ टेबलस्पून तांदळाचं पीठ, १ कांदा.

★ **कृती :** सर्व सर्वप्रथम बांगडे घेऊन त्यांच्या पोटाकडचा भाग चिरून घ्यावा. त्यांना चांगले साफ करून घ्यावे. स्वच्छ करून घेतलेल्या बांगड्यांना कट करून खाचा पाडून घ्या. आतमध्ये लिंबाचा रस, मीठ लावून घ्या. त्यात लाल तिखट मिक्स करून बांगड्यांना लावून घ्या. १५-२० मिनिटे झाकून ठेवा.
तोपर्यंत मिक्सरच्या भांड्यात खोबरं, धणे, काळिमिरी, कोकम, मिरची, कोथिंबीर, लसूण एकत्र करून थोडं पाणी घालून मसाला बारीक वाटून घ्या. वाटणामध्ये १ टेबलस्पून लाल तिखट, हळद, मीठ, कांदा घालून चांगले मिक्स करा. बांगड्यामध्ये व्यवस्थित भरून घ्यावे. त्यानंतर ते मिश्रण बाहेर येऊ नये, तसेच बांगडा कुरकुरीत व्हावा यासाठी रवा आणि तांदळाचे पीठ, थोडे लाल तिखट मिक्स करून घ्यावे. आता गॅस पेटवून त्यावर पॅन ठेवावा. त्यात तेल घालून गॅस मध्यम आचेवर असावा. भरलेले बांगडे रवा-तांदूळ पिठाच्या मिश्रणात छान घोळवून पॅनमध्ये फ्राय करण्यासाठी ठेवावे. दोन्ही बाजूने चांगले भाजून घ्यावे.




# मॅटेओ बेरेटिनीने दुखापतीमुळे मैदान सोडले

## फ्रेंच ओपन! मॅटेओ अर्नाल्डी उपांत्य फेरीत



**इटालियन खेळाडू मॅटेओ अर्नाल्डीने फ्रेंच ओपनच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. ग्रँड स्लॅम स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचण्याची अर्नाल्डीची ही पहिलीच वेळ आहे. मॅटेओ बेरेटिनीला कमरेच्या दुखापतीमुळे उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यातून माघार घ्यावी लागल्याने अर्नाल्डीला विजेता घोषित करण्यात आले. सामन्याच्या सुरुवातीला अर्नोल्डी ७-५, ५-२ ने आघाडीवर होता.**

■ पॅरिस

**बेरेटिनीने** सामन्याची सुरुवात प्रभावीपणे केली. त्याने पहिल्या ३ गेममध्ये दोनदा सर्व्हिस ब्रेक करून ३-० अशी आघाडी घेतली. या अनुभवी खेळाडू मॅटेओ बेरेटिनीचे सामन्यावर पूर्ण नियंत्रण असल्याचे दिसत होते. तथापि, अर्नाल्डी शांत राहिला आणि हळूहळू सामन्यात परतला. पहिल्या सेटमध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये एक दीर्घ आणि चुरशीची लढत पाहायला मिळाली. ७६ मिनिटे चाललेल्या या सेटमध्ये अनेक रोमांचक रॅलीज झाल्या. बेरेटिनीने एका गेममध्ये पाच ब्रेक पॉइंट वाचवले, पण शेवटच्या गेममध्ये तो आपली सर्व्हिस राखू शकला नाही, ज्यामुळे अर्नाल्डीने ७-५ ने विजय मिळवला. पहिला सेट गमावल्यानंतर बेरेटिनीचा त्रास वाढू लागला. दुसऱ्या सेटमध्ये २-१ ने मागे असताना त्याने मेडिकल टाइमआउट घेतला.

उपचार घेतल्यानंतर तो कोर्टवर परतला आणि खेळण्याचा प्रयत्न केला, पण वेदना वाढतच गेल्या. अखेरीस त्याने माघार घेण्याचा निर्णय घेतला. सामन्यानंतर बेरेटिनीने सांगितले की, पहिल्या सेटदरम्यान त्याला कमरेत अस्वस्थता जाणवू लागली. त्याने वेदनांकडे दुर्लक्ष करून खेळणे सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला, सामना जसजसा पुढे सरकला आणि त्याला अधिक सर्व्हिस आणि फोरहँड मारावे लागले, तसतशी वेदना वाढली. त्या स्थितीत खेळणे अत्यंत कठीण झाले होते.

दरम्यान, २५ वर्षीय अर्नाल्डीची प्रभावी कामगिरी सुरूच आहे. जागतिक क्रमवारीत १०४ व्या क्रमांकावर असलेला अर्नाल्डी या वर्षीच्या फ्रेंच ओपनमधील सर्वात मोठ्या आश्चर्यपैकी एक म्हणून उदयास आला आहे. १९९७ नंतर फ्रेंच ओपनमध्ये उपांत्य फेरी गाठणारा तो सर्वात कमी रँक असलेला खेळाडू ठरला आहे.

## कोहली अफगाणिस्तानविरुद्ध एकदिवसीय मालिकेतून बाहेर

■ मुंबई



**भारतीय** संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली हॅमस्ट्रिंगच्या (मांडी) दुखापतीमुळे अफगाणिस्तानविरुद्धच्या आगामी ३ एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतून बाहेर पडला. ही मालिका १३ जूनपासून सुरू होणार असून, दुखापतीमुळे कोहलीला विश्रांती देण्यात आली आहे.

आयपीएलमधील बंगळुरु आणि गुजरात यांच्यातील अंतिम सामन्यामध्ये फलंदाजी करत असताना सलामीवीर विराट कोहलीला दुखापतीचा त्रास जाणवत होता. सामन्यात बऱ्याच वेळेस फिजिओ विराटच्या दुखापतीसाठी मैदानात आला होता. त्यानंतर आता विराटला दुखापतीमुळे आरामाची गरज आहे. त्यामुळे त्याला एकदिवसीय सामन्यातून बाहेर पडावे लागले आहे.

## इंडोनेशिया ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या पी.व्ही.सिंधूचा पराभव

■ जकार्ता

**भारताची** स्टार बॅडमिंटनपटू आणि दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही.सिंधूचा इंडोनेशिया ओपन २०२६ मधील प्रवास संपुष्टात आला. प्री-क्वार्टर फायनलमध्ये (१६ संघांच्या फेरीत) दक्षिण कोरियाच्या जागतिक क्रमवारीत अव्वल आणि विद्यमान ऑलिम्पिक चॅम्पियन आन से यंगने तिला २१-१७, २१-१४ अशा सरळ गेम्समध्ये पराभूत केले. सलग दुसऱ्या आठवड्यात सिंधू आन से यंगकडून पराभूत झाली आहे.

जकार्ता येथील सामन्यात सिंधूने काही वेळा प्रभावी खेळ दाखवला, पण तिला तो संपूर्ण सामन्यात टिकवता आला नाही. दक्षिण कोरियाची स्टार खेळाडू आन से यंगने महत्त्वाच्या क्षणी उत्तम नियंत्रण दाखवत २१-१७, २१-१४ असा विजय मिळवला. गेल्या आठवड्यात सिंगापूर ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीतही सिंधू आन से यंगकडून पराभूत झाली. गेल्या काही वर्षांपासून दुखापती आणि अस्थिर फॉर्ममुळे त्रस्त असलेल्या सिंधूसाठी हा हंगाम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. इंडोनेशिया ओपनमधील तिची मोहीम लवकर संपली असली तरी आगामी मोठ्या स्पर्धांमध्ये ती पुनरागमन करण्याची आशा बाळगून असेल.

## राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा सोलापूर, धाराशिव, पुणे, मुंबई उपनगर उपांत्य फेरीत

■ सोलापूर



**महाराष्ट्र** खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सुरू असलेल्या ५२ व्या कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीतील सामने प्रचंड रंगतदार झाले. कुमार गटात धाराशिव, पुणे, मुंबई उपनगर आणि सोलापूर आणि मुलींच्या गटात सांगली, सोलापूर, धाराशिव आणि ठाणे यांनी दमदार विजयांसह उपांत्य फेरीत धडाकेबाज प्रवेश केला.

कुमार गटातील सर्वाधिक चुरशीच्या सामन्यात सोलापूरने ठाण्याचा ४२-४० असा २ गुणांनी निसटता पराभव केला. मध्यंतरास दोन्ही संघ २०-२० अशा बरोबरीत होते. मात्र मध्यंतरापूर्वी आणि अंतिम डावात मिळालेल्या प्रत्येकी एका ड्रीम रनमुळे सोलापूरच्या विजयाचा पाया रचला गेला होता. दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात धाराशिवने अहिल्यानगरचा ४९-२८ असा दणदणीत पराभव करत धुव्वा उडवला. हरद्या वसावे (२.२० मि. संरक्षण व ८ गुण) आणि राज जाधव (१.३० मि. संरक्षण व १० गुण) यांच्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर धाराशिवने एकहाती वर्चस्व गाजवले. पराभूत अहिल्यानगरकडून गौरव कुडले (१.१०, १.२०, मि. संरक्षण व ८ गुण) याने एकाकी झुंज दिली. तिसऱ्या सामन्यात मुंबई उपनगरने सांगलीला ४०-३६ असे नमवत उपांत्य फेरीचे तिकीट निश्चित केले. मध्यंतरातील २४-१६ ही आघाडी निर्णायक ठरली.

## राज्य ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये ठाण्याची चमकदार कामगिरी

■ ठाणे

**७४ व्या** महाराष्ट्र राज्य वरिष्ठ गटाच्या ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या धावपटूंनी स्पृहणीय यश संपादन केले. या स्पर्धेत ७ सुवर्णपदकांसह २ रौप्य आणि एक कांस्यपदक मिळवून ठाणे जिल्ह्याने छाप पाडली.

पुरुषांच्या ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत ठाण्याच्या धावपटूंनी वर्चस्व राखले. या शर्यतीत गिरीक बंगेराने ४७.५५ सेकंद अशा कामगिरीसह सुवर्णपदक जिंकले. तर ही शर्यत ५३.०३ सेकंदात पूर्ण करणाऱ्या अली शेखला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. साहिल गेदामने १४.५८ सेकंद अशा कामगिरीसह ११० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्णपदक आपल्या नावे केले. अभिषेक पाटीलने २० किलोमीटर चालण्याच्या शर्यतीत १ तास ५८ मी. ४० सेकंद अशी वेळ नोंदवत अव्वल स्थान मिळवले.

## शॉन टेटने बांगलादेशचे गोलंदाजी प्रशिक्षकपद सोडले

■ ढाका

**ऑस्ट्रेलियाचे** माजी वेगवान गोलंदाज शॉन टेटने बांगलादेशच्या वेगवान गोलंदाजी प्रशिक्षकपदाचा तात्काळ राजीनामा दिला. १२ महिन्यांपासून बांगलादेश क्रिकेट बोर्डासोबत काम केल्यानंतर आता आपल्या लहान कुटुंबाला अधिक वेळ देण्यावर लक्ष केंद्रित करायचे असल्याचे त्याने सांगितले. शॉन टेटने सांगितले की, बांगलादेश क्रिकेट बोर्ड आणि बांगलादेश संघासोबतचे माझे १२ महिने समाधानकारक काम होते, मला बोर्डाचे आभार मानायचे आहेत. खेळाडूंसोबत काम करताना मला खूप आनंद झाला. वेगवान गोलंदाजांसोबत माझे खूप चांगले संबंध आहेत.

## कोलंबोमध्ये मल्लखांब कार्यशाळा संपन्न

**कोलंबो** - भारतीय उच्च आयोग, कोलंबोतील स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्र व अष्टांग योग मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर कोलंबोमध्ये मल्लखांबाच्या १० कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. पहिल्या दिवशी स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्र येथे या कार्यशाळांचा उद्घाटन विश्व मल्लखांब महासंघाचे संस्थापक, संचालक व मल्लखांबाचे विश्वगुरू पद्मश्री उदय देशपांडे यांच्या हस्ते पार पडला.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RFx (E-TENDER) NOTICE**

MSETCL invites online bids from reputed and registered contractors of appropriate class with MSETCL. Please visit Mahatransco website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| RFx (Tender) No. | Name of work | Estimated cost in Rs. | EMD (Rs.) | Tender fee incl. GST (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 7000040194 | Providing Catering Services at Training Centre and ABB residential Camp at Regional Training Centre under HVDC RS (O&M) Circle, Padghe for FY 2026-27. | INR 18,50,000/- (including taxes) | INR 18,500/- | INR 590/- |

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of download of RFx (e tender) documents | From- 05.06.2026 from 00.00 hrs. to 22.06.2026 up to 10.00 hrs. |
| 2 | Date of submission of RFx (e tender) | 22.06.2026 up to 10.00 hrs. |
| 3 | Date of technical bid opening | 22.06.2026 at 11.00 hrs. (If possible) |
| 4 | Date of commercial bid opening | 22.06.2026 at 13.00 hrs. (If possible) |

**Contact Person: The Executive Engineer (ADM),**
HVDC RS (O&M) Circle, Padghe, Mob. No: 9011021483
For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**HVDC RS O&M Circle, Padghe**

देश विदेश

# नशीब तुम्ही केरळमध्ये आहात
## मोनालिसा विवाहावर कोर्टाची टिप्पणी

■ तिरुवनंतपुरम

**प्रयागराज** कुंभमेळ्यातील व्हायरल व्हिडिओमुळे देशभर प्रसिद्ध झालेली मोनालिसा भोसले पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. मुस्लीम तरुण मोहम्मद फरमान खानशी विवाह केल्यानंतर निर्माण झालेल्या वादावर केरळ उच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने केलेली टिप्पणी सध्या चर्चेचा विषय ठरली आहे.

न्यायमूर्ती कौसर एडप्पागथ यांच्या खंडपीठासमोर अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी झाली. न्यायालयाने तोंडी निरीक्षण नोंदवताना, तुम्ही दोघे सध्या केरळमध्ये आहात, यासाठी स्वतःला नशीबवान समजा असे म्हटले. मध्य प्रदेशात या विवाहावरून धमक्या मिळत असल्याच्या दाव्यासंदर्भात ही टिप्पणी केली. मोनालिसा भोसले हिने मोहम्मद फरमान खानशी विवाह केल्यानंतर वाद निर्माण झाला आहे.

# मुझफ्फरपूरच्या रुग्णालयात आग

**४ ठार**

**मुझफ्फरपूर** - बिहारमधील मुझफ्फरपूर येथे खासगी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात मध्यरात्री सुमारे ३ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत चार जणांचा मृत्यू झाला असून २० हून अधिक रुग्ण व नातेवाईक जखमी झाले आहेत. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले व आगीवर नियंत्रण मिळवले. रुग्णांच्या नातेवाईकांनी सांगितले की, आगीनंतर संपूर्ण वॉर्ड धुराने भरून गेला होता. त्यामुळे रुग्णांना श्वास घेणेही कठीण झाले. अनेकजण बेडवर असहाय्य अवस्थेत पडले होते. काही नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनावर गंभीर आरोप करत डॉक्टर व कर्मचारी रुग्णांना सोडून पळून गेल्याचा दावा केला आहे. आयसीयूमध्ये दाखल असलेल्या ९३ वर्षीय राधा देवी यांनी सांगितले की, अचानक वॉर्डमध्ये धूर पसरू लागल्याने त्यांनी ऑक्सिजन मास्क काढून बाहेर येत सुरक्षारक्षकांना आगीची माहिती दिली.

# माजी पंतप्रधान थाकसिन शिनावात्रा
## ४ महिनेआधीच तुरुंगातून मुक्त



■ बँकॉक

**थायलंडचे** माजी पंतप्रधान थाकसिन शिनावात्रा यांना राजघराण्याने माफ केल्यामुळे शिक्षेच्या ४ महिने अगोदरच तुरुंगातून मुक्त करण्यात आले. समर्थकांनी जल्लोषाने त्यांच्या सुटकेचा आनंद साजरा केला होता. राणी सुथिदा यांच्या वाढदिवसानिमित्त शिनावात्रा यांना माफी देण्याचा निर्णय राजघराण्याच्या वतीने घेण्यात आला. थायलंडमध्ये राजेशाही असल्याने दोषींना माफी देऊन तुरुंगातून मुक्त करण्याचे अधिकार राजघराण्याला आहेत.

थायलंडमधील आघाडी सरकारचा भाग असलेल्या फिऊ थाई पार्टीमधून शिनावात्रा पुन्हा राजकारणात सक्रिय होतील, असा अंदाज आहे. मात्र ते आता राजकारणापासून लांब राहू इच्छित असल्याचे त्यांच्या कुटुंबियांनी म्हटले आहे. थाकसिन हे दूरसंचार क्षेत्रातील एक मोठे उद्योजक होते. त्यांनी १९९८ मध्ये स्वतःचा राजकीय पक्ष स्थापन केला होता. ते २००१ पासून परदेशात असताना २००६ मध्ये त्यांच्याविरोधात लष्करी उठाव झाला. या उठावामुळे पदावरून हटवले जाईपर्यंत ते पंतप्रधान म्हणून कायम होते. ते परदेशात असतानाही त्यांच्या प्रभावाखालील राजकीय पक्षांनी थायलंडमध्ये सरकार स्थापन केले होते. भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली त्यांना अटक झाली होती आणि एक वर्षाची शिक्षा सुनावली गेली होती. त्यापैकी ८ महिन्यांची शिक्षा भोगल्यानंतर ११ मे रोजी त्यांना पॅरोलवर सोडले गेले होते. याकाळात हालचालींवर देखरेखीसाठी त्यांना इलेक्ट्रॉनिक पट्टी मनगटावर बांधली गेली होती.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# हिमाचल प्रवेश कराच्या निषेधार्थ पंजाबमध्ये 'खालसा टोल' लागू

■ चंदीगड



**हिमाचलच्या वाहनांकडून वसुली सुरू**

**पंजाब-हिमाचल** सीमेवर हिमाचल प्रदेश सरकारने लादलेल्या प्रवेश कर आणि टोलनाक्यांविरुद्ध सुरू असलेल्या आंदोलनाला आज एक नवीन वळण लागले. या संघर्षावर कोणताही तोडगा निघत नसल्यामुळे शिरोमणी जरनैल साहिबजादा बाबा जुझार सिंग निहंग सिंग खालसा दलाने किरतपूर-मनाली राष्ट्रीय महामार्गावरील गडाजवळ एक खालसा प्रवेश कर तपासणी नाका उभारला आणि प्रवेश कर वसुली सुरू केली.

बाबा अच्छर सिंग यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या या तपासणी नाक्यावर, हिमाचल प्रदेश नोंदणी क्रमांक असलेल्या वाहनांकडून कर आकारण्यास सुरुवात झाली. संघटनेच्या सदस्यांनी लहान खाजगी वाहनांकडून १०० रुपये आणि मोठ्या व्यावसायिक वाहनांकडून ५०० रुपयांपर्यंत कर गोळा करण्यास सुरुवात केली. या काळात तपासणी नाक्यावर मोठ्या संख्येने निहंग सिंग उपस्थित होते. खालसा दलाने म्हणणे आहे की, हिमाचलच्या सीमेवर लादलेल्या करांमुळे पंजाबमधील चालक आणि शेतकऱ्यांवर बोजा पडत आहे. अनेक आंदोलने आणि प्रशासनासोबत चर्चा करूनही कोणताही ठोस परिणाम साधला गेला नाही, त्यामुळे त्यांना हे पाऊल उचलण्यास भाग पडले.

राष्ट्रीय महामार्गावरील या तात्पुरत्या तपासणी नाक्यामुळे वाहतुकीत तात्पुरता व्यत्यय आला होता. मात्र, संघटनेचे कार्यकर्ते वाहने थांबवून ठराविक रक्कम वसूल केल्यानंतर त्यांना पुढे जाऊ देत होते. खालसा दलाचे नेते बाबा अच्छर सिंग यांनी सांगितले की, जोपर्यंत हिमाचल सरकार पंजाबमधील जनता आणि वाहनचालकांवर लादलेला कर रद्द करत नाही किंवा या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढत नाही, तोपर्यंत त्यांचा संघर्ष सुरूच राहील.

# गिलगिट-बाल्टिस्तान प्रदेशात
## २ ऑगस्टला स्थानिक निवडणुका

■ गिलगिट

**गिलगिट-बाल्टिस्तान** प्रदेशातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २ ऑगस्ट रोजी होणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) राजा शहबाज खान यांनी सांगितले. या प्रदेशाच्या विधानसभा निवडणुका २४ जानेवारी २०२६ रोजी होणार होत्या, तर २० वर्षांहून अधिक कालावधीनंतर जाहीर झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका १४ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार होत्या. या घोषणांनंतर काही दिवसांतच प्रदेशातील प्रतिकूल हवामानामुळे दोन्ही निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आल्या. पत्रकार परिषदेत राजा शहबाज खान म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेळापत्रक जारी करण्यात आले आहे.

# ईस्टर संडे बॉम्बस्फोटांप्रकरणी
## गोटाबाया राजपक्षेंना विदेशवारी बंदी

■ कोलंबो

२०१९ च्या ईस्टर संडे बॉम्बस्फोटांच्या तपासाची व्याप्ती वाढवल्याने श्रीलंकेच्या एका न्यायालयाने माजी राष्ट्राध्यक्ष गोटाबाया राजपक्षे यांच्या परदेशी प्रवासावर बंदी घातली. त्यासोबत लष्करी कर्नल मोहम्मद अन्सार आणि माजी गुप्तचर अधिकारी प्रेमानंद उदलगामा उर्फ सिल्वा यांनाही ही प्रवासबंदी लागू आहे.

देशभरातील चर्च आणि आलिशान हॉटेल्सना लक्ष्य करून २१ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटांचा तपास करणाऱ्या गुन्हे अन्वेषण विभागाने दाखल केलेल्या याचिकेवर विचार करून कोलंबो फोर्ट मॅजिस्ट्रेट कोर्टाने हा आदेश जारी केला.

या बॉम्बस्फोटांमध्ये ११ भारतीयांसह २७० लोकांचा मृत्यू झाला होता. राज्य गुप्तचर संस्थेचे माजी प्रमुख सुरेश साले यांना या प्रकरणात संशयित मानले जात आहे. त्यांना २५ फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली होती आणि हल्ल्यांच्या कथित सूत्रधाराच्या तपासाचा भाग म्हणून ते सध्या कोठडीत आहेत.

# पालिकेच्या किचकट प्रकल्पांमध्ये
## सल्लागार नेमणे गरजेचे असते

**अतिरिक्त आयुक्त बांगर यांचे स्पष्टीकरण**

■ मुंबई

**सध्या** मुंबई महापालिकेत विविध प्रकल्प कामांमध्ये सल्लागारांची मोठ्या संख्येने नियुक्ती केली जात आहे. यावर स्थायी समिती बैठकीत सर्वपक्षीय सदस्यांनी आक्षेप घेतला असला तरी पालिका प्रशासन सल्लागार नेमणुकीवर ठाम असल्याचे दिसत आहे. कारण पालिकेकडे कर्तव्यदक्ष अभियंते असले तरी टाटा कन्सल्टन्सी कंपनीकडे मोठी टीम असल्याने किचकट कामासाठी सल्लागार नेमणे गरजेचे आहे,असे स्पष्ट मत पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी व्यक्त केले.

स्थायी समितीच्या काल बुधवारी झालेल्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त बांगर यांनी टाटा कन्सल्टन्सी कंपनीच्याच सल्लागार नियुक्तीवर प्रशासनाची बाजू मांडली. १२ मे रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत सर्वपक्षीय नगरसेवकांनी सल्लागार नियुक्तीवर आक्षेप घेतला. तसेच टाटा कन्सल्टन्सी कंपनीलाच प्रत्येक कामात सल्लागार म्हणून काम दिले जाते, असा सवाल उपस्थित केला होता. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अतिरिक्त आयुक्त बांगर हे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, पाणीपुरवठा प्रकल्पात डीपीआर बनवणे, १०० ते १५० खोल बोगदा बनवणे यासाठी सल्लागाराची गरज भासते आणि टीसीएस कंपनीची टीम असते. त्यामुळे किचकट प्रकल्पासाठी सल्लागार असणे गरजेचे आहे.

# शेअर बाजारात १५ लाख कोटींचा घोळ

पान ८ वरून

नियामक संस्थेच्या मते कंपनीने सोने शुद्धीकरण आणि प्रक्रिया करण्यासाठी मिळणारे सेवा शुल्क दाखवण्याऐवजी संपूर्ण सोन्याच्या व्यवहाराचे मूल्यच महसूल म्हणून दाखवली. यासंदर्भातील ग्राहकांची माहिती, बिले आणि इतर आवश्यक कागदपत्रेही पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आली नाहीत.

आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे, कंपनीचे प्रवर्तक राजेश मेहता यांच्या वैयक्तिक पातळीवरील काही व्यवहार कंपनीच्या व्यवसायाचा भाग म्हणून दाखवण्यात आले. अंदाजे ११,४८७ कोटी रुपयांची विक्री आणि ११,४८८ कोटी रुपयांची खरेदी कंपनी व्यवहारांमध्ये दाखवण्यात आली. मात्र हे व्यवहार प्रत्यक्षात वैयक्तिक स्तरावर केलेले डेरिव्हेटिव्ह व्यवहार असल्याचा सेबीचा आरोप आहे. याशिवाय परकीय चलनातील चढ-उतारातून झालेला नफा, म्युच्युअल फंड आणि मुदत ठेवींवरील व्याज उत्पन्न यांचाही समावेश कामकाजातून मिळालेल्या महसुलात करण्यात आल्याचा आरोप आहे.

# माजी मंत्री अनंतराव थोपटेंचे निधन

■ पुणे



**भोर** मतदारसंघाचे माजी आमदार आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात आज संध्याकाळी त्यांनी अल्पशा आजारामुळे अखेरचा श्वास घेतला.

त्यांनी एकूण १४ वर्ष मंत्रिपद भूषवलेले होते. ते एकूण ६ वेळा भोर मतदारसंघाचे आमदार राहिले. आपल्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. ते पुण्याचे पालकमंत्री देखील राहिले होते. काँग्रेस पक्षातही त्यांच्या शब्दाला मोठा मान होता. थोपटे यांचे चिरंजीव संग्राम थोपटे सध्या राज्याच्या राजकारणात सक्रीय आहेत.

# अंधेरी सब-वेसाठी भाजपाने स्वीकारला ठाकरेंचा फॉर्म्युला! ५०० कोटींचा खर्च

■ मुंबई

**पावसाळ्यात** वारंवार पाण्याखाली जाणाऱ्या अंधेरी सब-वेच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी भाजपाने उबाठा आमदार आदित्य ठाकरे यांचा फॉर्म्युला स्वीकारला आहे. अंधेरी परिसरात तीन मोठ्या भूमिगत पाणी साठवण टाक्या उभारण्याचा विचार सुरू असून, या प्रकल्पासाठी सुमारे ५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या टाक्यांची एकूण पाणी साठवण क्षमता ४१ हजार घनमीटर इतकी असेल.

या प्रस्तावाच्या अनुषंगाने भाजपा आमदार अमित साटम यांनी महापालिका अधिकाऱ्यांची भेट घेत प्रकल्पाबाबत चर्चा केली. अंधेरी सब-वे परिसरात पावसाचे पाणी साचून वाहतूक ठप्प होण्याचे प्रकार दरवर्षी घडत असल्याने या योजनेकडे महत्त्वाच्या उपाययोजनेच्या रूपाने पाहिले जात आहे. विशेष म्हणजे, अशाच प्रकारचा प्रकल्प हिंदमाता परिसरात तत्कालीन मंत्री आणि उबाठा आमदार आदित्य ठाकरे यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला होता. हिंदमाता परिसरातील पूरस्थिती कमी करण्यासाठी उभारण्यात आलेल्या भूमिगत जलसाठा टाक्या हा यशस्वी प्रयोग मानला जातो. त्यामुळे अंधेरीसाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या योजनेची तुलना हिंदमाता मॉडेलशी केली जात आहे. आदित्य ठाकरेंच्या अनेक प्रकल्पांवर सातत्याने टीका करणाऱ्या भाजपाकडून आता त्याच सूत्राचा स्वीकार होत असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. राजकारणात विरोध कायम असला तरी अंधेरीतील पाणी तुंबण्याच्या प्रश्नावर आदित्य ठाकरेंच्या मॉडेलवरच विश्वास दाखविला जात आहे. दरम्यान २०२३ मध्ये २१ वेळा, २०२४ मध्ये २५ वेळा व २०२५ मध्ये २२ वेळा अंधेरी सब-वे पाण्याखाली गेला होता. गेल्या तीन वर्षांत तब्बल ६८ वेळा सब-वे बंद करण्याची वेळ आल्याने कायमस्वरूपी उपाययोजनेची मागणी जोर धरत होती.

# जेएनपीए ते मुंबई जलवाहतूक
## गेटवे ऐवजी माझगाव डॉक

■ मुंबई

**पावसाळ्यातील** खवळलेला समुद्र व वादळी वाऱ्यांचा संभाव्य धोका लक्षात घेता, जेएनपीए ते मुंबई दरम्यानच्या जलवाहतूक मार्गात तात्पुरता बदल करण्यात आला आहे. आता १ जून ते ३० सप्टेंबरपर्यंत सर्व प्रवासी बोटी गेट वे ऑफ इंडियाऐवजी आता माझगाव डॉकजवळच्या भाऊचा धक्का येथून जेएनपीएकडे ये-जा करतील, अशी माहिती जेएनपीएच्या वाहतूक विभागाने दिली. जेएनपीए बंदर ते मंबई अशी जलवाहतक सेवा गेल्या ३७ वर्षांपासून सुरू आहे. पावसाळ्यात वादळी वारे समुद्रात उसळणाऱ्या महाकाय लाटा यामुळे गेट वे ऑफ इंडियापर्यंत प्रवासी बोटींना प्रवास करणे धोक्याचे ठरते. त्यामळे गेट वे ते अलिबाग. त्याचप्रमाणे गेट वे ते घारापरी (एलिफंटा) येथील जलसेवाही बंद करण्यात येते. मात्र उरणच्या मोरा ते मुंबई या जलमार्गावरील वाहतूक बारमाही सुरू असते. जेएनपीए ते मुंबई ही जलवाहतूकही सुरू ठेवण्यात येते. मात्र पावसाळ्यात या सेवेच्या मार्गात बदल केला जातो. जेएनपीए ते मुंबई जलमार्गात पावसाळ्यात समुद्राच्या भरतीमुळे समुद्रात ४ ते ५ मीटर उंचीच्या लाटा उसळतात.

**मे. आशापुरा गार्मेन्ट्स लिमिटेड (परिसमापनामध्ये)**
**सीआयएन: U13101GJ1994PLC067515**
**ई-लिलाव विक्री सूचना**

मे. आशापुरा गार्मेन्ट्स लिमिटेड, नोंदणीकृत कार्यालयः प्लॉट क्र. ३, ब्लॉक-सी, सेक्टर-१२एस, अदानी पोर्ट्स ॲण्ड सेझ, मुंद्रा, गुजरात - ३७०४२१ यांच्या निम्न उल्लेखित मालमत्तांच्या, सेवा पुरवठादार बँकनेट मार्फत वेबसाईट https://baanknet.com/ द्वारे विक्रीकरिता, नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ आणि त्याअंतर्गत बनलेल्या विनियमनांनुसार सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| लिलावाचा दिनांक आणि वेळ | दि. १० जुलै, २०२६, दु. २.०० ते सायं. ४.०० सायं. ७.०० वाजेपर्यंत प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह |
| ईएमडी सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक | दि. ०८ जुलै, २०२६ |
| लिलावाअंतर्गत मालमत्तेच्या पाहणी (पूर्व परवानगीने) आणि योग्य चौकशीकरिता अंतिम दिनांक | दि. ०८ जुलै, २०२६ |
| नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रतेच्या उद्घोषणेसह, आवश्यक दस्तऐवज सादर करण्याकरिता अंतिम दिनांक | दि. ०८ जुलै, २०२६ |

नवयुग इंडस्ट्रियल इस्टेट, शिवडी, मुंबई - ४०००१५ येथे स्थित गाळे.

(रु. लाखात)

| अ. क्र. | वर्णन | बिल्ट अप क्षेत्र (चौ.मी.मध्ये) | राखीव किंमत | ईएमडी रक्कम | बोली विस्तार मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| i. | गाळा क्र. ११५ | ३९.४८ | ४८.६ | ४.८६ | ५.०० |
| ii. | गाळा क्र. ३०१ | १२१.६९ | १४९.४ | १४.९४ | ५.०० |
| iii. | गाळा क्र. ४०१ | १४९.२९ | १८३.६ | १८.३६ | ५.०० |
| iv. | गाळा क्र. ४०७ | ६१.१२ | ७५.६ | ७.५६ | ५.०० |
| v. | गाळा क्र. ४०८ | ७९.६१ | ९८.१ | ९.८१ | ५.०० |

विक्रीच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणेः-

१. ई-लिलाव "जसे आहे जेथे आहेत, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर" मान्यताप्राप्त सेवा प्रदाता बँकनेटमार्फत (https://baanknet.com/) द्वारे आयोजित करण्यात येईल.
२. संपत्तीचे तपशील, ऑनलाईन ई-लिलाव बोली अर्ज, उद्घोषणा आणि हमीपत्राचा फॉर्म, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण अटी आणि शर्ती समाविष्ट असलेले संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया प्रपत्र वेबसाईटः https://baanknet.com/ येथे उपलब्ध आहे आणि तुम्ही +९१ ८२९१२२०२२० येथे किंवा ई-मेलः support.baanknet@psballiance.com, किंवा परिसमापकांना त्यांचा ईमेलः irp.ashapura@gmail.com येथे संपर्क करू शकतात.
३. संभाव्य बोलीदारांनी नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रतेच्या उद्घोषणेसह, आवश्यक दस्तऐवज वेबसाईट https://baanknet.com/ वर सादर करावे.
४. संभाव्य बोलीदारांनी इसारा रक्कम अनामत (ईएमडी) बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जमा करावी.
५. जर बोलीदार अपात्र आढळल्यास, ईएमडी जप्त करण्यात येईल.

**सीए मोहित बिपिनचंद्रा अदातिया**
**परिसमापक - आशापुरा गार्मेन्ट्स लिमिटेड (परिसमापनामध्ये) चे परिसमापक**
IBBI/IPA-001/IP-P-01966/2019-2020/13004
४०६, बी एम स्क्वेअर २, एचडीएफसी बँकच्या वर, राजलक्ष्मी पार्क,
मोतीबाग रोड, जुनागड, गुजरात, भारत - ३६२००१.
ईमेलः irp.ashapura@gmail.com
दिनांकः ०५ जून, २०२६
ठिकाणः जुनागड

**जाहीर सूचना**

कृपया याची नोंद घ्यावी की, श्रीमती वेलबाई डुंगरशी निशार या खालील मालमत्तेच्या मालक, धारक, ताबेदार व संपूर्ण मालकीहक्क प्राप्त व्यक्ती आहेत, म्हणजे:- (१) दिनांक २९ मे २०२३ रोजीचा कायमस्वरूपी पर्यायी निवास करार, जो त्याच दिवशी अंधेरी-६ येथील संयुक्त दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी क्र.बीडीआर/१७/६७८८/२०२३ अंतर्गत नोंदणीकृत करण्यात आला असून, तो मे. शीतल डेव्हलपर्स (त्यामधील मालक/विकासक म्हणून प्रथम पक्ष) आणि सौ. वेलबाई डुंगरशी निशार (त्यामधील रहिवासी/भाडेकरू म्हणून द्वितीय पक्ष) यांच्यामध्ये करण्यात आला होता, सदर करारानुसार मे. शीतल डेव्हलपर्स यांनी फ्लॅट क्र. ४०२, क्षेत्रफळ अंदाजे ४१९ चौ. फूट (कार्पेट क्षेत्रफळ) असलेल्या निवासी प्रिमायसेसचा शांततापूर्ण, रिकामा, निर्विघ्न व विशेष ताबा मालकी हक्काच्या आधारावर वाटप करण्याचे मान्य केले होते. (२) तसेच दिनांक २९ मे २०२३ रोजीचा दुसरा कायमस्वरूपी पर्यायी निवासी करार, जो त्याच दिवशी अंधेरी-६ येथील संयुक्त दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी क्र.बीडीआर/१७/६७८९/२०२३ अंतर्गत नोंदणीकृत करण्यात आला असून, तो मे.शीतल डेव्हलपर्स (त्यामधील मालक/विकासक म्हणून प्रथम पक्ष) आणि सौ. वेलबाई डुंगरशी निशार (त्यामधील रहिवासी/भाडेकरू म्हणून द्वितीय पक्ष) यांच्यामध्ये करण्यात आला होता, सदर करारानुसार मे.शीतल डेव्हलपर्स यांनी फ्लॅट क्र. ४०३, क्षेत्रफळ अंदाजे ६६६ चौ.फूट (कार्पेट क्षेत्रफळ) असलेल्या निवासी प्रिमायसेसचा शांततापूर्ण, रिकामा, निर्विघ्न व विशेष ताबा मालकी हक्काच्या आधारावर वाटप करण्याचे मान्य केले होते, वरील दोन्ही फ्लॅटचे एकत्रित कार्पेट क्षेत्रफळ अंदाजे १०८५ चौ. फूट (कार्पेट क्षेत्रफळ) असून, ते नव्याने बांधण्यात आलेल्या 'प्रताप हार्मनी' या इमारतीच्या ४थ्या मजल्यावर, ओल्ड नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९ येथे स्थित असून, बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत, मुंबई उपनगर जिल्हा व नोंदणी उपजिल्ह्याच्या अधिकारक्षेत्रात, महसुल गाव गुंदवली, ता. अंधेरी येथील सी.टी.एस. क्र.१०६, १०६/१ ते १०६/५ या मालमत्तेवर उभारण्यात आलेली आहे (एकत्रितपणे मालमत्ता), सदर मालमत्ता सौ. वेलबाई डुंगरशी निशार यांना त्यांच्या जुन्या भाडेकरू ताब्यातील प्रिमायसेस म्हणजे गांधी भवन येथील ३ऱ्या मजल्यावरील खोली क्र. ११ च्या बदल्यात तसेच ठरलेल्या मोबदल्याच्या रकमेवर आणि इतर अटी व शर्तींनुसार देण्यात आलेली आहे.

अशाप्रमारे, सौ. वेलबाई डुंगरशी निशार या सदर मालमत्तेच्या संपूर्ण व निर्विवाद मालकीहक्कास पात्र असून, कोणत्याही प्रकारच्या बोजा किंवा अडथळ्यांशिवाय सदर मालमत्तेचा सतत, अखंडित वापर, वहिवाट, उपभोग, ताबा व मालकीहक्क धारण करण्यास पूर्णपणे हक्कदार आहेत.

सर्व व्यक्तिस किंवा व्यक्तिंना सदर फ्लॅट क्र. ४०२ व ४०३ आणि/किंवा त्यासंबंधित करारनामे अथवा त्यांचा कोणताही भाग यांवर किंवा त्यासंदर्भात पर्यायी निवास विक्री, अदलाबदल, गहाण, भार, भेट, ट्रस्ट, वारसा, ताबा, भाडेपट्टा, धारणाधिकार अथवा दिवंगत भाडेकरू डुंगरशी भारमल निशार यांचे वारस म्हणून किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणाचा काही हक्क, शिर्षक , हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्यास, त्यांनी त्या संबंधीची माहिती मूळ कागदपत्रे व दस्तऐवजांसह या सूचनेच्या प्रसिद्धीपासून ७ (सात) दिवसांच्या आत मला लेखी स्वरूपात कळवावी, असे करण्यात अयशस्वी झाल्यास, असे मानले जाईल की सदर फ्लॅटक्र.४०२ आणि ४०३ किंवा त्याच्या कोणत्याही भागावर असे कोणतेही दावे किंवा मागण्या अस्तित्वात नाहीत आणि ते, जर असतील तर, सर्व हेतूंसाठी सोडून दिलेले, त्यागलेले आणि माफ केलेले/सोडून दिलेले मानले जातील.

मुंबई, आज दिनांकित ०५ जून २०२६

सही/-
**प्रशांत एम. पाषाणकर**
**वकील, उच्च न्यायालय, मुंबई**
५१५, सर विठ्ठलदास चेंबर्स, १६, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**निविदा सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग रोहा कार्यालया अंतर्गत मटेरियल ट्रान्सपोर्ट च्या कामासाठी वर्ष २०२६-२७ करीता परवानाधारक ठेकेदाराची नियुक्ती करणेसाठी ई-निविदा क्रमांक टी - ०५ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. सदर निविदा विक्रीसाठी दि. ०४.०६.२०२६ ते १२.०६.२०२६ पर्यंत उपलब्ध राहील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. १२.०६.२०२६ ला रात्री ११.०० वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धी पत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

PRO NO - 061 कार्यकारी अभियंता, रोहा विभाग

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| निविदा दस्तऐवज क्र. | २०२६_बृमुंमपा_१३०६४१४_१ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषयः | जी/दक्षिण प्रभाग कार्यालय इमारत, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई ४०००१३ येथे निर्दिष्ट दरसूचीवर आधारित, उद्धृत केलेली उच्चतम मासिक रॉयल्टी रकमेवर आणि ११ महिन्यांच्या लिव्ह अँण्ड लायसन्स तत्त्वावर उपहारगृह चालविणे. |
| निविदेची किंमत | रु. ३६३/- + १८% जी.एस.टी. |
| ई-निविदेची किंमत (अंदाजित किंमत) | लागू नाही |
| ईएमडी | रु. १०,०००/- |
| सुरक्षा ठेव | रु. ५०,०००/- |
| निविदा पारित आणि विक्री करण्याचा दिनांक (सुरुवात दिनांक) | दि. ०५.०६.२०२६ रोजी स. ११.०० वा. |
| निविदा विक्री आणि बोली सुरक्षा अनामत/ईएमडी स्वीकारण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | दि. १२.०६.२०२६ रोजी स. ११.०० वा. |
| पाकीट अ, ब, आणि क (ऑनलाईन)चे सादरीकरण | दि. १२.०६.२०२६ रोजी स. ११.०० वा. |
| पाकीट अ उघडणे | दि. १५.०६.२०२६ रोजी स. ११.०० वा. |
| पाकीट ब उघडणे | दि. १५.०६.२०२६ रोजी स. ११.०० वा. |
| पाकीट क उघडणे | दि. १७.०६.२०२६ रोजी स. ११.०० वा. |
| संपर्काचा पत्ता | सहाय्यक आयुक्त जी-दक्षिण प्रभाग यांचे कार्यालय, १ला मजला, जी/दक्षिण प्रभाग इमारत, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई - ४०००१३. |
| बोली उघडण्याचे ठिकाण | सहाय्यक अभियंता (परिरक्षण) जी-दक्षिण प्रभाग यांचे कार्यालय, १ला मजला, जी/दक्षिण प्रभाग इमारत, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई - ४०००१३ येथे ऑनलाईन |

**सदर निविदा प्रपत्र अ-हस्तांतरणीय आहे.**
कोणतेही कारण न दर्शविता वरील विषयाकरिता प्राप्त कोणतेही अर्ज स्वीकारणे किंवा कोणतेही किंवा सर्व अर्ज फेटाळण्याचे हक्क बृमुंमपाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

सही/-
सहा. अभि. (परिरक्षण)
जी/दक्षिण प्रभाग

पीआरओ/४८८/जाहि./२०२६-२७

वेळेत निदान, वाचवी प्राण

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 011 / 2026–27**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost in Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| TN0107 BM1 | 3000069102 | WORK OF REPAIR OF BOILER FIRST & SECOND PASS BUCK STAY IN UNIT NO. 4 COH. | 3080000.00 | 34300.00 |
| TN109 CHP1 | 3000069124 | WORK OF TRANSORTATION OF COAL FROM CHP-I & CHP-II TO REQUIRED LOCATIONS WITHIN PLANT PREMISES AS AND WHEN REQUIRED BASIS AT TPS KHAPERKHEDA. | 2448000.00 | 27980.00 |
| TN0112 BM1 | 3000069203 | BIENNUAL WORK CONTRACT FOR MECHANICAL MAINTENANCE OF COAL MILLS, COAL FEEDER & SEAL AIR FAN AT UNIT NO. 1 & 2. | 20882049.00 | 212320.49 |
| TN0113 AHP1 Refloated | 3000069222 | Restoration of Seal Trough Nozzle Flushing System with Repairing, Restructuring & Strengthening of Complete Platform & Stairs of BAH of in 4 Capital Overhaul. | 676260.00 | 10262.60 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, Thermal Power Station, Khaperkheda

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## प्रिया बापटचा गौप्यस्फोट



**प्रसिद्ध** अभिनेत्री प्रिया बापट हिने तिच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातील एक अत्यंत धक्कादायक आणि अस्वस्थ करणारा अनुभव शेअर केला आहे. फिल्मफेअरच्या 'ॲक्टर्स राउंडटेबल' दरम्यान दिलेल्या एका मुलाखतीत तिने हा खुलासा केला असून, तिच्या एका पहिल्या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान सहकलाकाराने कशाप्रकारे व्यावसायिक मर्यादा ओलांडल्या आणि तिला मानसिक त्रास दिला, याबद्दल तिने सविस्तर भाष्य केले आहे. हा संपूर्ण प्रकार 'सिटी ऑफ ड्रीम्स' या प्रसिद्ध वेबसीरिजमध्ये काम करण्यापूर्वी घडला होता. प्रियाच्या सांगण्यानुसार, त्या चित्रपटाच्या संहितेमध्ये एक किसिंग सीन होता, ज्यावर तिने सुरुवातीलाच दिग्दर्शकाकडे आक्षेप नोंदवला होता. हा सीन कथेसाठी का आवश्यक आहे आणि त्याचे औचित्य काय, असा प्रश्न ती सातत्याने विचारत होती. मात्र, केवळ आपल्या मनातील भीती आणि संकोच दूर करण्यासाठी तिने संपूर्ण चित्रपटात केवळ एकाच अशा सीनसाठी संमती दिली. परंतु, जेव्हा भोपाळमध्ये या गाण्याचे चित्रीकरण सुरू झाले, तेव्हा संबंधित अभिनेत्याने आधी ठरलेल्या गोष्टींच्या पलीकडे जाऊन स्वतःहून बदल (इम्प्रोवायझेशन) करण्यास सुरुवात केली आणि तो तिला वारंवार किस करत राहिला. त्यावेळी नेमकी कशी प्रतिक्रिया द्यावी किंवा स्वतःसाठी कशी भूमिका घ्यावी, हे न कळल्याने ती अत्यंत अस्वस्थ झाली होती. हा त्रास केवळ सेटपुरता मर्यादित नव्हता, तर ते दोघे एकाच हॉटेलमध्ये वेगवेगळ्या खोलीत राहत असताना त्या अभिनेत्याने तिला वैयक्तिक पातळीवरही त्रास देण्यास सुरुवात केली. तो तिला वारंवार मॅसेज करून 'चल, तुला पोहायला शिकवतो', 'आपण रात्री एकत्र जेवायला जाऊया' किंवा 'सकाळच्या नाश्त्याला भेटूया का?' असे विचारून सतत त्रास देत होता. प्रियाने त्याला स्पष्टपणे नकार दिला होता, कारण तिच्या आयुष्यात असा प्रकार आधी कधीच घडला नव्हता. मग तिने पती उमेश कामतला बोलावून घेतले. उमेश सेटवर आल्यानंतर त्या अभिनेत्याने स्वतःवर नियंत्रण ठेवले. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत केवळ हा एकच अत्यंत वाईट आणि अस्वस्थ करणारा अनुभव होता, असे प्रियाने अखेरीस स्पष्ट केले.

## एकताचा नवा अध्याय



प्रसिद्ध मनोरंजन निर्माती आणि उद्योजिका एकता कपूर हिने 'एकत्र ज्वेल्स' या आधुनिक लक्झरी ज्वेलरी ब्रँडमध्ये गुंतवणूकदार आणि भागीदार म्हणून सहभागी होण्याची घोषणा केली आहे. हा नवा ब्रँड प्रामुख्याने नव्या पिढीच्या ग्राहकांना डोळ्यांसमोर ठेवून सुरू करण्यात आला असून, यामुळे एकता कपूर यांच्या व्यावसायिक कारकिर्दीत एका नव्या अध्यायाची सुरुवात झाली आहे. या भागीदारीच्या निमित्ताने एकता कपूर आणि तिची दीर्घकाळाची मैत्रीण, सुप्रसिद्ध इंटिरियर डिझायनर सुझैन खान व्यावसायिक पातळीवर एकत्र आल्या आहेत. या नव्या प्रवासाविषयी बोलताना एकता कपूर यांनी स्पष्ट केले की, ही भागीदारी माझ्या आजवरच्या सर्जनशील प्रवासाशी सुसंगत आहे. मी नेहमीच स्वतःचे निर्णय स्वतः घेणाऱ्या आणि यशाची नवी व्याख्या लिहिणाऱ्या महिलांच्या कथा मांडल्या आहेत, त्यामुळे 'एकत्र' हा ब्रँड त्यांच्या याच विश्वासाचा पुढचा टप्पा आहे. आधुनिक महिलांची जीवनशैली आणि त्यांची अभिव्यक्ती लक्षात घेऊन काहीतरी अर्थपूर्ण निर्माण करण्याची ही मोठी संधी असल्याचे त्यांनी नमूद केले. सुझैन खान यांच्यासोबत असलेल्या जुन्या मैत्रीचे व्यावसायिक भागीदारीत रुपांतर होणे हा एक अतिशय स्वाभाविक आणि आनंददायी अनुभव असल्याचेही त्यांनी सांगितले.

## दीडशे कोटींचे 'कॉकटेल'



दिनेश विजान यांच्या मॅडॉक फिल्म्सनिर्मित 'कॉकटेल २' या चित्रपटाची सध्या डिजिटल माध्यमांवर जोरदार चर्चा सुरू आहे. या रोमँटिक-कॉमेडी चित्रपटाचे भव्य स्वरूप, चित्रीकरणाची ठिकाणे आणि सादरीकरण यामुळे प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. होमी अदजानिया यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला आणि शाहिद कपूर, क्रिती सेनॉन तसेच रश्मिका मंदाना यांच्या मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट येत्या १९ जून रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. हा हिंदी चित्रपटसृष्टीतील आजवरच्या सर्वात महागड्या रोमँटिक-कॉमेडी चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटाचा निव्वळ निर्मिती खर्च साधारण ९५ कोटी रुपये इतका आहे. याशिवाय, चित्रपटातील मुख्य कलाकार म्हणजेच शाहिद, क्रिती आणि रश्मिका यांच्या मानधनावर एकूण ३५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त, निर्मात्यांनी चित्रपटाच्या प्रिंट्स आणि प्रसिद्धीवर आणखी २० कोटी रुपये खर्च केले आहेत. हा सर्व खर्च एकत्र केला असता, 'कॉकटेल २'चा एकूण अंतिम खर्च १५० कोटी रुपयांच्या घरात पोहोचला आहे. सध्याच्या काळात या धाटणीच्या चित्रपटावर १५० कोटी रुपये खर्च करण्याचे धाडस सहसा निर्माते करत नाहीत, मात्र दिनेश विजान यांनी कथेवर विश्वास ठेवून स्केल, संगीत आणि सादरीकरणात कोणतीही तडजोड केलेली नाही.


## 'बंदर' करतोय अडचणींचा सामना




अभिनेता बॉबी देओल स्टारर आगामी चित्रपट 'बंदर' याला थिएटर्समध्ये शो मिळवण्यावरून मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या आठवड्यात प्रदर्शित होणाऱ्या इतर मोठ्या चित्रपटांमुळे मल्टिप्लेक्समध्ये सुरू असलेल्या स्क्रीन-शेअरिंग वादाच्या पार्श्वभूमीवर, या चित्रपटाच्या निर्मात्यांनी व झी स्टुडिओजने राष्ट्रीय मल्टिप्लेक्स साखळीमध्ये चित्रपटाचे शो तात्पुरते स्थगित ठेवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

हा चित्रपट ५ जून रोजी प्रदर्शित होणार असून, थिएटर्ससोबत शोच्या वेळेवरून आणि संख्येवरून सुरू असलेला वाद अद्याप सुटू शकलेला नाही. चित्रपटाच्या निर्मात्यांनी अतिशय मर्यादित आणि प्रेक्षकांच्या वेळेनुसार शोची मागणी केली होती. त्यांनी ५ स्क्रीन असलेल्या मल्टिप्लेक्समध्ये दुपारी १ नंतर केवळ ४ शो आणि ४ स्क्रीन असलेल्या मल्टिप्लेक्समध्ये ३ शो देण्याची न्याय्य मागणी केली होती. मात्र, पीव्हीआर आयनॉक्स आणि सिनेपोलिस हे राष्ट्रीय मल्टिप्लेक्स 'हैजवानी तो इश्क होना है' आणि 'पेड्डी' (हिंदी आवृत्ती) या चित्रपटांचे वितरण करत असल्याने, त्यांनी 'बंदर' चित्रपटाला दुय्यम स्थान दिले आहेत. 'पेड्डी' आणि 'हाय जवानी तो इश्क होना है' या चित्रपटांचे ॲडव्हान्स बुकिंग अपेक्षेपेक्षा कमी असूनही थिएटर्सकडून त्यांना झुकते माप दिले जात असल्याने 'बंदर'च्या चमूने आक्रमक भूमिका घेत शो निश्चित होईपर्यंत संपूर्ण प्रोग्रॅमिंग थांबवण्यास सांगितले आहे.

## रणवीर शौरींनी घेतला 'गिल्ड'चा समाचार



चित्रपटसृष्टीत सध्या 'डॉन ३' चित्रपटावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, अभिनेते रणवीर शौरी यांनी 'प्रॉड्युसर्स गिल्ड ऑफ इंडिया'च्या अधिकृत निवेदनाचा खरपूस समाचार घेतला आहे. चित्रपट अर्धवट सोडणाऱ्या किंवा शेवटच्या क्षणी माघार घेणाऱ्या कलाकारांमुळे निर्मात्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते, असे गिल्डने म्हटले होते. यावर तीव्र आक्षेप घेत रणवीर शौरी यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून निर्मात्यांच्या उत्तरदायित्वावर आणि त्यांच्याकडून होणाऱ्या कलाकारांच्या शोषणावर थेट बोट ठेवले आहे. शौरी म्हणतात की, निर्माते स्वतःहून अनेकदा चित्रपट रद्द करतात किंवा ते अनिश्चित काळासाठी पुढे ढकलतात, यामुळे कलाकारांचे जे आर्थिक आणि व्यावसायिक नुकसान होते, त्याची भरपाई देण्याचा साधा उल्लेखही निर्मात्यांकडून केला जात नाही, यावर तुमचा विश्वास बसणार नाही. एका सर्वसामान्य कामसू कलाकाराला आणि तंत्रज्ञाला चित्रपट रद्द झाल्यावर कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई मिळत नाही, हाच या उद्योगातील सर्वात मोठा विरोधाभास असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, आपण एका चित्रपट निर्मात्याचाच मुलगा असल्यामुळे आपल्याला या क्षेत्रातील दोन्ही बाजू चांगल्या प्रकारे ठाऊक आहेत, असेही त्यांनी एका कायदेशीर तज्ज्ञाला उत्तर देताना आवर्जून सांगितले.

## दिलजीत आणि कंगनामध्ये 'रुपेरी टक्कर'



अभिनेता आणि गायक दिलजीत दोसांझ आणि अभिनेत्री-खासदार कंगना रणौत यांच्यात बॉक्स ऑफिसवर एक मोठा संघर्ष पाहायला मिळणार आहे. या दोन्ही कलाकारांचे आगामी चित्रपट येत्या १२ जून रोजी चित्रपटगृहात आमनेसामने येणार आहेत. दिलजीत दोसांझचा 'मैं वापस आऊंगा' आणि कंगना रणौतचा 'भारत भाग्य विधाता' हे दोन्ही चित्रपट एकाच दिवशी प्रदर्शित होणार असल्याने बॉलिवूड वर्तुळात या क्लॅशची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

गेल्या काही वर्षांत सोशल मीडिया आणि विविध सामाजिक-राजकीय मुद्द्यांवरून दिलजीत दोसांझ आणि कंगना रणौत यांच्यात मोठे वाद रंगले आहेत. आता हा वाद थेट तिकीट खिडकीवर पोहचणार आहे. 'पैंटलून एंटरटेन्मेंट' आणि 'एएलटी बालाजी'ची निर्मिती असलेला 'मैं वापस आऊंगा' हा चित्रपट एका रंजक आणि भावनिक कथेवर आधारित आहे, तर दुसरीकडे कंगनाचा 'भारत भाग्य विधाता' हा देशभक्ती आणि राजकीय पार्श्वभूमी असलेला एक भव्य चित्रपट आहे.

दोन्ही चित्रपटांचे विषय आणि प्रेक्षकवर्ग पूर्णपणे वेगळा असल्याने हा सामना रंजक ठरणार आहे. दोन्ही कलाकारांचा चाहता वर्ग मोठा असल्याने या क्लॅशमध्ये कोणता चित्रपट बाजी मारतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पैठणमध्ये १७ वर्षीय मुलाची हत्या शिंदे गटाच्या नगरसेवकावर गुन्हा

**नगरसेवक फरार**

■ पैठण

**पैठण** शहरातील इंदिरानगर परिसरात १७ वर्षीय अनमोल देविदास अहिरे याची शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य हल्लेखोर असलेल्या अल्पवयीन मुलासह विकास पांडुरंग पवार याला अटक केली असून शिंदे गटाचे नगरसेवक ईश्वर भाऊसाहेब दगडे हे फरार आहेत. तिघांविरोधात हत्या आणि ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी मयत अनमोलचे वडील देविदास शशिकांत अहिरे (४६) यांनी पैठण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, मंगळवारी रात्री सुमारे ९ वाजता तहसील कार्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावरील रेणुका अपार्टमेंट (इंदिरानगर) परिसरात ही घटना घडली. फिर्यादी आणि आरोपी हे सर्वजण इंदिरानगरमधील एकाच गल्लीतील रहिवासी आहेत. आरोपींना फिर्यादीची जात माहिती असूनही मुख्य आरोपीने फोन करून त्यांना घटनास्थळी बोलावून घेतल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

अनमोल अहिरे हा परिसरात उभा असताना मुख्य आरोपी असलेला अल्पवयीन मुलगा तेथे आला. काही दिवसांपूर्वी झालेल्या वादाच्या कारणावरून त्याने अनमोलच्या छातीवर आणि पोटावर चाकूने वार केले. या हल्ल्यात अनमोल गंभीर जखमी झाला. त्यानंतर त्याचा मृत्यू झाला. या घटनेवेळी विकास पांडुरंग पवार आणि नगरसेवक ईश्वर भाऊसाहेब दगडे यांनी मुख्य आरोपीला प्रोत्साहन दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

## रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी वडाळा आरटीओत मराठी शिकवणी वर्ग

■ मुंबई

**मुंबईतील** अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा गरजेपुरती बोलता यावी यासाठी वडाळा प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) कालपासून मराठी भाषा शिकवणी वर्ग सुरू केले. पहिल्या दिवशी एकूण ७० रिक्षा-टॅक्सी चालकांनी शिकवणी वर्गात हजेरी लावली.

कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या सहकार्याने वडाळा आरटीओमध्ये मराठी भाषा शिकवणी वर्ग नियमित सुरू राहणार आहेत. प्रत्येक शिकवणी सत्र हे एका तासाचे असेल. यामध्ये नेहमीच्या वापरातील मराठी शब्द शिकवण्यात येणार आहेत. याबाबत बोलताना वडाळा आरटीओमधील एका अधिकाऱ्याने सांगितले की, मराठी भाषा शिकवणी वर्गाला पहिल्याच दिवशी चालकांकडून लाभलेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे.

## गुवाहाटीचा उठाव केला नसता तर आज काय स्थिती असती?

**मंत्री गुलाबराव पाटलांचे वक्तव्य**

■ मुंबई

**विधान** परिषद निवडणुकीचा अर्ज मागे घेण्याचा आज अखेरचा दिवस होता. परंतु या पार्श्वभूमीवर महायुतीत सुरू असलेल्या अंतर्गत नाराजीवरून राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी भाजपाला सुनावले. नाशिक आणि जळगावमधील बंडखोरीच्या मुद्यावर बोलताना त्यांनी, आम्ही गुवाहाटीचा उठाव केला नसता तर आज काय स्थिती राहिली असती? असा सवाल उपस्थित करत महायुतीतील समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण केले.

गुलाबराव पाटील म्हणाले की, स्थानिक पातळीवर काही नाराजी असू शकते, मात्र ती वेळेत दूर करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी अब्दुल सत्तार यांची नाराजी दूर केली. मात्र महायुतीत मोठ्या भावाने लहान भावाकडे नीट लक्ष दिले पाहिजे, अशी सर्वांची अपेक्षा आहे. आमच्या पाच विद्यमान जागा होत्या. त्यापैकी फक्त चार जागा आम्हाला मिळाल्या. आम्ही त्यावर समाधान मानले. पण त्या चार जागांवरही बंडखोरी होत असेल, तर तो आमच्यावर अन्याय आहे. दोन्ही पक्षांनी प्रामाणिकपणे काम केले तरच युती मजबूत राहील. कमी जागा घेऊनही आमच्या उमेदवारांविरोधात बंडखोर उभे राहत असतील तर कार्यकर्त्यांना काय सांगायचे? अशा प्रकारच्या घडामोडी युतीच्या भविष्यासाठी योग्य नाहीत.

## मुंबईतील दुकाने नोंदणीचे शुल्क ९ वर्षांपासून बंदच

**पालिकेला ५०० कोटी महसुलाचा फटका**

■ मुंबई

**मुंबईमध्ये** दुकाने नोंदणीचे शुल्क गेल्या ९ वर्षांपासून बंद आहे. हे शुल्क न आकारल्यामुळे मुंबई पालिकेला ५०० कोटींहून अधिक महसुलाचा फटका बसला आहे. त्यामुळे आता हे बंद असलेले शुल्क पुन्हा सुरू करण्यासाठी विधी समिती आग्रही आहे.

मुंबई महापालिकेकडून २०१७ पासून दुकानांचे नोंदणी नूतनीकरण शुल्क आणि कचरा निर्मूलन आकार वसूल करणे बंद झाल्याने गेल्या ९ वर्षात पालिकेला अंदाजे ३०० ते ५०० कोटी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडावे लागले आहे, असा गंभीर निष्कर्ष पालिकेच्या विधी समितीने काढला आहे. २०१७ पूर्वी या शुल्कातून पालिकेला दरवर्षी ६० ते ८० कोटी रुपयांचा महसूल मिळत होता, याकडेही समितीने लक्ष वेधले आहे. दुकाने आणि आस्थापनांचे नामफलक मराठीत करण्यासाठी गेल्या १५ दिवसांपासून शिंदे सेनेने जोरदार मोहीम राबवली आहे. विधी समिती अध्यक्षा दीक्षा कारकर यांनी त्यासाठी पुढाकार घेतला आहे. या मोहिमेदरम्यान त्यांना दुकाने आणि आस्थापना खात्यात अनेक त्रुटी दिसून आल्या. त्या दूर करण्यासाठी आयुक्तांनी संयुक्त बैठक बोलवावी, अशी मागणी केली आहे. त्याचप्रमाणे पालिकेच्या संगणकीय अभिलेखानुसार ३१ मार्च २०२६ पर्यत मुंबईत १०,८३,२५१ आस्थापनांची ऑनलाइन नोंदणी झाली आहे. परंतु या प्रणालीमध्ये गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत.

## निदा खानला ओळखत नव्हतो केवळ मदतीसाठी रुम दिली

**मतीन पटेल यांचा दावा**

■ छत्रपती संभाजीनगर

**नाशिकमधील** टीसीएस धर्मांतरण प्रकरणात मुख्य संशयित निदा खान हिला आश्रय दिल्याचा आरोप असलेले एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांची एसआयटीकडून पुन्हा चौकशी होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतीन पटेल यांनी भूमिका स्पष्ट करत निदा खानला आपण वैयक्तिकरित्या ओळखत नसल्याचा दावा केला. तसेच या प्रकरणाशी एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांचा कोणताही संबंध नसल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

मतीन पटेल म्हणाले, निदा खानला मी पूर्वीपासून ओळखत नव्हतो. तिच्या आई-वडिलांनी मदतीसाठी माझ्याशी संपर्क साधला होता. त्यानंतर मानवतेच्या दृष्टिकोनातून मी तिला दोन-तीन दिवसांसाठी राहण्यासाठी रुम उपलब्ध करून दिली. तिची पार्श्वभूमी किंवा ती कोण आहे याची मला कोणतीही माहिती नव्हती. एकदा निदा खानचा फोन आला होता. तिने दूध आणि खारी पाठवण्याची विनंती केली होती. त्यावेळी मी माझ्या मुलामार्फत ते साहित्य पाठवले.

यापलीकडे माझा तिच्याशी कोणताही संबंध नव्हता. मागील चौकशीत मतीन पटेल यांनी इम्तियाज जलील यांच्याशी संपर्क झाल्याचे मान्य केले होते. याबाबत स्पष्टीकरण देताना ते म्हणाले, इम्तियाज जलील हे माझे राजकीय नेते आहेत. कोणतीही अडचण आल्यास मी त्यांच्याशी चर्चा करतो. मात्र या प्रकरणाची त्यांना कोणतीही माहिती नव्हती.

## मालाडमध्ये बेस्टची कारला धडक! चालकाचा जागीच मृत्यू

■ मुंबई

**मालाड** (पूर्व) येथील पुष्पा पार्क परिसरात आज सकाळी सुमारे ६.५० वाजण्याच्या सुमारास झालेल्या अपघातात ओला कारचालकाचा मृत्यू झाला. बेस्टच्या वडाळा आगारातील मार्ग क्रमांक ४४० वरील बस नियमित फेरी पूर्ण करून डेपोकडे परत जात असताना हा अपघात घडला.

संबंधित ओला कार रस्त्याच्या कडेला उभी होती. त्यावेळी चालक वाहन स्वच्छ करत असताना मागून आलेल्या बेस्ट बसने कारला धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की कारचा पूर्णपणे चुराडा झाला. या अपघातात कारचालकाचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सकाळच्या गर्दीच्या वेळी ही घटना घडल्याने वेस्टर्न एक्स्प्रेस महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. अनेक वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि वाहतूक विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

## सहावीच्या नवीन पाठ्यपुस्तकांच्या छपाईला विलंब! २५ जूनपर्यंत प्रतीक्षा




■ मुंबई

**राज्य** मंडळाशी संलग्न शाळांमधील विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीची पाठ्यपुस्तके जून महिन्यात उपलब्ध होणार आहेत. पण इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना नव्या पुस्तकांसाठी २५ जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. सहावीच्या पुस्तकांच्या निर्मिती आणि छपाईचे काम अद्याप सुरू असल्याने ही पुस्तके जूनअखेरीस विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील, अशी माहिती बालभारतीच्या संचालक अनुराधा ओक यांनी दिली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमात टप्प्याटप्प्याने बदल करण्यात येत आहेत. त्यानुसार बालभारतीकडून इयत्तानिहाय नव्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती सुरू आहे. गेल्या वर्षी इयत्ता पहिलीची नवी पुस्तके प्रकाशित करण्यात आली होती. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमानुसार पुस्तके मिळणार आहेत. सहावीच्या नव्या पुस्तकांना १ जून रोजी मान्यता मिळाली आहे. त्यामुळे त्यांच्या छपाईचे काम आता सुरू होणार आहे. परिणामी, सहावीची सर्व माध्यमांची पुस्तके २५ ते ३० जूनदरम्यान राज्यातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

## पंतप्रधान मोदींनी गुजरातला दिले १८ हजार ७७७ कोटींचे प्रकल्प

■ गांधीनगर

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी उद्या गुजरातमध्ये तब्बल १८ हजार ७७७ कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे भूमिपूजन आणि उद्‌घाटन करणार आहेत. केंद्र सरकार आणि गुजरात सरकार मिळून या प्रकल्पांची उभारणी करणार आहेत. औद्योगिक विकासाला चालना देणे, पर्यावरणीय पायाभूत सुविधा मजबूत करणे तसेच गुंतवणुकीच्या आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे, या उद्देशाने या प्रकल्पांची उभारणी करण्यात येत आहे. या प्रकल्पांमध्ये गुजरात औद्योगिक विकास महामंडळाच्या (जीआयडीसी) १,०६३.४३ कोटी रुपये किमतीच्या आठ प्रकल्पांचा समावेश आहे. त्यापैकी ८९४ कोटींचे प्रकल्प भरूच जिल्ह्यात आहेत. तर वलसाडला १६९.३ कोटी रुपयांचे प्रकल्प मिळाले आहेत. भरूच जिल्हा हा राज्यातील रसायने आणि पेट्रोकेमिकल्स उत्पादनाचे केंद्र मानला जातो.

## राज्य सरकारचा नवा सुधारित माथाडी कायदा मालकधार्जिणा


**ॲड. लक्ष्मणराव पाटील यांचे मत**

■ नवी मुंबई

**राज्य** सरकारने माथाडी ॲक्ट १९६९ मध्ये माथाडी कामगार कुणाला म्हणायचे आणि कोणत्या उद्योगाला माथाडी कायदा लागू होतो याबाबतच्या केलेल्या सुधारित तरतुदी या माथाडी कायदा कमकुवत करणाऱ्या असून मालकधार्जिण्या आहेत, असे परखड मत मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड. लक्ष्मणराव पाटील यांनी माथाडी कामगार मेळाव्यात व्यक्त केले.

महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार युनियन आणि महाराष्ट्र श्रमिक सहकारी पतपेढी मर्यादित यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ कामगार नेते बळवंतराव पवार यांच्या वाढदिवसानिमित्त तुर्भे, नवी मुंबई येथे माथाडी कामगार मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात माथाडी कामगारांच्या १० वी आणि १२ वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या ४४ विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कामगार मेळाव्यात माथाडी कामगार नेते प्रकाश पाटील, संदिप पवार, सुहास आळेकर, अरुण संखे यांनी कामगारांना विविध समस्यांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी माथाडी नेते बळवंतराव पवार यांनी सांगितले की, मागील १० ते १५ वर्षांपासून मुंबई, ठाणे, रायगड, पालघर या जिल्ह्यातील नोंदीत माथाडी कामगारांची संख्या कमी होऊन बेकायदेशीर अनोंदीत कामगारांची संख्या वाढली आहे. माथाडी मंडळामध्ये चेअरमन, सचिव आठवड्यातून एकदोन दिवस येऊन कामगारांच्या समस्या सोडविण्याकडे दुर्लक्ष करत आहेत. मंडळात पुरेसे निरिक्षक व कर्मचारी नाहीत.

# नवाकाळ शब्दकोडे-१६२७



**आडवे शब्द –**

२. उशीर, दिरंगाई ४. फारकत घेणे, घटस्फोट ७. लहान मुलगी १०. वाढत जाणारे ११. लोचट, लाळ घोट्या १३. पायांचा आवाज १४. तरबेज, निष्णात १५. गव्हाची लोकप्रिय जात १७. घर, सदन १८. पागोट्यावरून गुंडाळलेले वस्त्र २०. सरोवराचा किंवा नदीचा काठ २२. उथळ पाण्याचा मोठा आवाज २५. ब्राह्मण २७. सरहद्द २८. प्रशंसा, कौतुक ३०. आहारी गेलेला, अंकित याअर्थी शब्दप्रयोग ३२. हात, बाहू ३३. अन्नछत्र ३५. मासेमारीचा हक ३६. तृण ३७. जनावर ३८. झाड, वृक्ष ४०. रामरस, मीठ ४१. नशेत असलेला ४२. श्रीकृष्णाच्या जिवावर उठलेली मावशी ४५. पृथ्वी ४६. ध्वनी ४८. ज्ञानेश्वरांनी याच्या तोंडून वेद वदवले होते ४९. ओसाड जमिनीवर किंवा पिकात वाढणारे तण, नक्षत्रफूल, पांढरफुली ५१. आदराने शिर झुकवलेला ५५. नेमस्त ५६. जंगल ५७. समय ५९. धुडगूस ६०. विसर्जित, बरखास्त ६१. मोटर सायकलचे जुने नाव ६३. विविध ६५. निरीक्षण करणारा, इन्स्पेक्टर ६७. शेष ६८. अंगणाचे दार ७०. प्रदेश, टापू ७१. पंचाईत, वानवा ७४. कमळांचे तळे; विष्णू ७६. शालूचा पदर ७७. मुक्त, अनिर्बंध ७८. लुब्ध, अनुरक्त ७९. आयुष्य ८१. सतत बोलणे ८२. पौष्टिक तेलबिया, अळशी; यांची चटणी करतात. ८४. ओझे, भार ८७. कष्टांना सरावलेला ८७. पुनश्च ८८. लक्षावधी ९१. गोजी, पाडी ९२. लहान मूल ९३. मार्गातली अडचण, काटा ९४. सुरेल ९७. बालक ९८. सरपटणारा अजस्त्र प्राणी १००. घोडेस्वाराची पाय ठेवण्याची जागा १०१. मौज, चंगळ १०२. नवरा, पती १०३. पांढरा, श्वेत, धवल १०४. मार्ग १०५. रुधिर

**उभे शब्द –**

१. अचानक, एकाएकी २. वैकुंठ ३. शक्तिशाली ४. समय ५. किंमत ६. दयावान ७. झेंडा, ध्वज ८. चामड्याची कोल्हापुरी चप्पल ९. विचारांना चालना देणारे १२. ढग १३. प्रतिहल्ला १६. आच, उष्णता १७. प्रतिबंध १९. पिकलेला २१. टाळण्याचा प्रयत्न २२. संगीतातील एक राग २३. व्यय २४. मजबूत २६. हळुवारपणे २७. लग्नाआधीचा एक विधी २९. कमीत कमी ३०. तराजूचा प्रकार ३१. आवेश ३२. लाकूड कापण्याचे अवजार ३४. वांती, ओकारी ३८. उक्ती, वक्तव्य ३९. अत्युच्च, श्रेष्ठ ४१. शोध घेणे ४३. होडी ४४. विड्याच्या पानांची वेल ४७. दाढी करण्याचे पाते ४८. नर्मदा नदी ४९. गावातील रहिवासी ५०. गोल फेरा ५२. बाजू, दिशा, कड, पक्ष ५३. अतिरेक; सुळक्यावरून ढकलण्याची शिक्षा ५४. ओशाळलेला ५५. वर्षाचा बारावा भाग ५८. निर्धन ६०. पोळीचा कुरकुरीत प्रकार ६२. रायगडावरचा प्रसिद्ध कडा ६४. निरुपाय ६५. निर्भेळ, शुद्ध ६६. दिलगिरी, माफी ६८. वेगळे होणे ६९. गलका, गोंगाट ७२. भूतपूर्व ७३. गोळा ७५. थडगे ८०. भगवान शंकर ८३. सार्वजनिक कामात दिलेला हातभार ८४. मोठी प्रसिद्धी ८५. अर्भकाचे केस ८७. प्राणी ८९. फुफ्फुसाचा आजार, कास ९०. ऋषींचे घर ९२. रिवाज, प्रघात ९३. कटीप्रदेश ९५. उणे, कमी ९६. जेव्हा, ज्या वेळी ९८. धुके ९९. फळातील मगज १००. रिक्त •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६२६ चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. पागा ४. होम ५. अणकुचीदार ९. देवक ११. भावार्थदीपिका १४. साधू १५. भयावह १७. वय १८. तरतूद २०. सरपण २२. साठेबाजी २४. फटकळ २७. वई २८. खेळ ३०. सलामत ३३. हरखणे ३६. उदारमतवादी ३९. हमाल ४०. वेल ४१. बनारस ४२. हाल ४३. दासी ४४. वार ४६. वेस ४७. अल्लड ४८. वंदन ४९. विमल ५०. ईहा ५१. गणना ५३. धाव ५४. तुती ५५. लेपडी ५७. दारू ५८. टवळे ६०. वामा ६१. विलाप ६२. धार ६४. मैना ६६. नवस ६८. नवार ६९. ओसरी ७१. कॅरम ७३. तरकस ७५. दामटी ७७. बदक ७९. हनुमान ८०. उरक ८१. भंपक ८३. रग ८६. दारमदार ८९. रसगुल्ला ९१. आवार ९२. हेका ९४. पारख ९५. नगद ९७. पार ९९. दम १००. सावळी १०२. वासव १०४. शकट १०६. हाकलणे १०७. अवीट १०८. कोलीत १०९. सुग्रीव ११०. केवळ ११२. तंबी ११३. तट्टू ११४. वडीलकी ११५. तफावत

**उभे शब्द :** १. अभाव २. पार्थ ३. गादी ४. होकार ५. अधू ६. कुठार ७. दाभण ८. रया ९. देह ठेवणे १०. करंजी १२. वायफळ १३. पितळ १४. साद १६. वसा १९. तूर्त २०. सलाम २१. पर्ण २३. बाई २५. कणीदार २६. सौर २८. खेप २९. जोम ३०. सवाल ३१. लादी ३२. तहसीलदार ३३. हलवाई ३४. खट्टू ३५. ढाल ३६. उनाड ३७. रसवंती ३८. तहानलेला ४०. वेसण ४१. बल्लव ४३. दाम ४५. रहाट ४६. वेगळे ४७. अधाशी ४९. विडी ५२. नायनाट ५४. तुमान ५६. पपनस ५९. वही ६१. विसर ६२. धारदार ६३. फूस ६५. विरह ६७. वतनदार ६९. ओटी ७०. मेद ७२. मनुज ७४. कर्दम ७६. मकर ७७. बक ७८. करवादणे ८०. उरग ८१. भंगूर ८२. पल्ला ८४. गरम ८५. पोहे ८७. रखवाली ८८. दानव ९०. सपाट ९३. कासावीस ९४. पाळी ९६. दशग्रीव ९८. नकळत १०१. वट १०३. सतत १०५. कवडी १०६. हाव १०८. कोबी ११०. केकी १११. मत

# मोसमी पाऊस केरळात

पान १ वरून

सुरुवात होण्याचा अंदाज आहे. त्यानंतर मान्सून मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भाच्या दिशेने टप्प्याटप्प्याने पुढे सरकेल. शेतकऱ्यांसाठी ही दिलासादायक बातमी मानली जात आहे. खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला असून अनेक भागांत शेतकरी पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण करत आहेत.

## ७ ते १४ जूनदरम्यान राज्यात मान्सून! डख यांचा अंदाज

हवामान अभ्यासक पंजाब डख यांनी ७ ते १४ जूनदरम्यान महाराष्ट्रातील बहुतांश भागात मोसमी पाऊस दाखल होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटले आहे की, ६ जूनपासून वातावरणात बदल जाणवण्यास सुरुवात होईल. त्यानंतर ७ जूनपासून कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे आदी दक्षिण महाराष्ट्रातील भागांमध्ये मोसमी पावसाच्या सरींची सुरुवात होऊ शकते. अहिल्यानगर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये यंदा दक्षिणेकडून मान्सून येण्याची शक्यता आहे. तसेच यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, भंडारा, अमरावती आणि बुलडाणा या भागांमध्येही मान्सून टप्प्याटप्प्याने पोहोचेल. पेरणीबाबत शेतकऱ्यांनी घाई करू नये. जमिनीत पुरेशी ओल गेल्यानंतरच पेरणीचा निर्णय घ्यावा. यावर्षी पेरणीचे तीन टप्पे राहू शकतात. पहिला टप्पा ७ ते १४ जून, दुसरा टप्पा २० ते ३० जून असेल. काही भागांमध्ये उशिरा पाऊस झाल्यास तिसरा टप्पा १० ते १५ जुलैदरम्यान असू शकतो.

# अपात्र बहिणींवर सरकारने २६ हजार कोटी उधळले

पान १ वरून

अपात्र लाभार्थ्यांनी शासनाचे जवळपास २६ हजार ७३० कोटी रुपये लाटले आहेत. तरीही सरकारने अपात्र महिलांकडून २२ महिन्यांत दिलेले हे पैसे वसूल न करण्याची भूमिका घेतली आहे. सरकारी कर्मचारी असलेल्या महिला, खोटेपणा करून लाभ घेतल्याने मुद्दाम केवायसी पूर्ण न करणाऱ्या महिला, आयकर भरणाऱ्या महिला, दुचाकी-तिचाकी मालकीच्या असणाऱ्या महिला अपात्र केल्या आहेत. मात्र या महिलांना आधी दिलेली रक्कम परत घ्यायची नाही, असा निर्णय सरकारने घेतला आहे. यावरून सरकारवर टीका होत आहे. मात्र ८१ लाख अपात्र लाभार्थ्यांपैकी १४ हजार लाभार्थी तर पुरुष आहेत. केवळ त्यांच्याकडून सर्व रक्कम वसूल केली जाईल, असे फडणवीस यांनी माध्यमाशी बोलताना सांगितले. ही योजना २१ ते ६५ वर्षे वयोगटातील अडीच लाखांच्या आत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या महिलांसाठी होती. या महिलांच्या बँक खात्यांमध्ये १ जुलै २०२४ पासून दरमहा दीड हजार रुपये जमा करण्यात आले. योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर पडणारा आर्थिक ताण लक्षात घेऊन सरकारने लाभार्थ्यांसाठी ई-केवायसी बंधनकारक केली. मात्र आता पडताळणीनंतर सुरुवातीला २ कोटी ४७ लाख असलेली लाभार्थी संख्या १ कोटी ६६ लाखांवर आली. त्यावरून ८१ लाख अपात्र लाभार्थ्यांनी शासनाचे २६ हजार ७३० कोटी रुपये लाटल्याचे स्पष्ट झाले.

# दिलीप वळसे-पाटलांनीही शरद पवारांची भेट घेतली

पान १ वरून - दिलीप वळसे-पाटील आणि शरद पवार यांच्यात झालेली चर्चा नेमकी कोणत्या विषयांवर झाली, याची माहिती स्वतः शरद पवार यांनी समाजमाध्यमांद्वारे दिली. या माहितीनुसार, राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमोरील प्रश्न, सहकार क्षेत्रातील सध्याची परिस्थिती, विविध सहकारी संस्थांशी संबंधित विषय आणि रयत शिक्षण संस्थेच्या कामकाजाशी निगडित मुद्द्यांवर दोन नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. मात्र, सध्याच्या राजकीय घडामोडींमुळे या भेटीचा फोटो समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू झाले आहेत. दरम्यान, नुकतीच एका मुलाखतीत तटकरे यांनी पहिल्यांदाच अजित पवार हयात असताना राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू होती, अशी कबुली दिली. त्यामुळे राष्ट्रवादीत नेमके काय चालले आहे, असा प्रश्न विचारला जात आहे.

# काकडेंची १५० कोटींची संपत्ती! जय पवारांना १० कोटी दिले?

पान १ वरून

काकडे यांनी निवडणूक प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार, जय पवार यांच्याशिवाय परवेज ग्रँट यांना २ कोटी १७ लाख रुपये तसेच रुस्तुम भरोचा, श्रीशा एंटरप्रायझेस, काकडे प्रमोटर्स, काकडे डेव्हलपर्स आणि राज डेव्हलपर्स यांसारख्या व्यक्ती व कंपन्यांना मिळून सुमारे ४० कोटी ९५ लाख रुपयांचे कर्ज दिले आहे. काकडे यांच्या एकूण मालमत्तेमध्ये बँक ठेवी, शेअर, विमा व पोस्टातील गुंतवणूक, ४१० ग्रॅम सोने, पाच किलोहून अधिक चांदी, घड्याळे, मोटारगाड्या आणि आलिशान बोटींचा समावेश आहे. बांधकाम क्षेत्रात त्यांनी १५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. त्यांच्या नावावर साडेसात लाख रुपयांची रोख रक्कम असून विविध बँक खात्यांमध्ये २९ लाख ५३ हजार ६२९ रुपये जमा आहेत. काकडे यांच्यावर ४१ कोटी ८० लाख २७ हजार ७६१ रुपयांचे कर्ज आहे. त्यांच्याकडे ५० लाख रुपये किमतीची परवानाधारक हत्यारे आहेत. त्यांची जंगम मालमत्ता ७८ कोटी ९५ लाख ६५ हजार ५३१ रुपयांची आहे. स्थावर मालमत्तेमध्ये मावळ तालुक्यातील दोन ठिकाणच्या जमिनी, मुंढवा येथील मालमत्ता, पाषाण परिसरातील ४,५४४ चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका आणि दुबईतील आलिशान सदनिकेचा समावेश आहे. पाषाण येथील त्याच आकाराची आणखी एक सदनिका त्यांनी पत्नी देविका काकडे यांना भेटस्वरूप दिली आहे.

# सेन्सॉर बोर्डाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे निधन

पान १ वरून

झाल्या उडता पंजाब, इंदू सरकार, लिपस्टिक अंडर माय बुरखा आणि बाबूमोशाय बंदूकबाज या चित्रपटांमध्ये त्यांनी अनेक दुरुस्त्या सुचवल्या होत्या. त्यावरून मोठा वादंग उठला होता. काही चित्रपट दिग्दर्शकांनी एकत्र पत्रकार परिषद घेत निहलानी यांना सेन्सॉर बोर्डावरून हटवण्याची मागणी केली होती. सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष असताना त्यांनी अनेक चित्रपटांना सुचवलेली काटछाट हा मोठा वादाचा मुद्दा ठरला. त्यामुळे सेन्सॉरशिप, चित्रपट निर्मात्याचे स्वातंत्र्य यावर बराच काळ वाद सुरू राहिला. मात्र त्यानंतरही निहलानी आपल्या तत्त्वांना धरून राहिले.

चित्रपट निर्माते म्हणून त्यांची काही दशकांची कारकीर्द उल्लेखनीय राहिली. विविध विषयावरील आणि विविध धाटणीच्या चित्रपटांची निहलानी यांनी निर्मिती केली. त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. विशेषतः १९९० च्या दशकात त्यांनी अभिनेता गोविंदासोबत केलेले चित्रपट खूप गाजले. गोविंदा,चंकी पांडे आणि कादर खान यांच्या मुख्य भूमिका असलेला आँखे (१९९३) हा चित्रपट ब्लॉकबस्टर आणि सर्वाधिक कमाई करणारा कॉमेडी-ॲक्शनपट ठरला. त्यांच्या शोला और शबनम (१९९२) या चित्रपटाने गोविंदाला ॲक्शन स्टार म्हणून ओळख मिळवून दिली. गोविंदाची सुरुवातीची कारकिर्द घडवण्यात निहलानी यांचे मोठे योगदान होते. त्यांनी इल्जाम, तलाश, रंगीला राजा आणि जुली-२ यांसारख्या लोकप्रिय चित्रपटांचीही निर्मिती केली होती.


**पूर्वोत्तर रेल्वे**

**ई-प्रापण प्रणालीद्वारे निविदेकरिता आमंत्रण**

वरिष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक, पूर्वोत्तर रेल्वे, लखनौ हे भारताच्या राष्ट्रपतींकरिता आणि त्यांच्या वतीने खालील वस्तुंच्या पुरवठ्याकरिता ई-प्रापण प्रणालीद्वारे निविदा आमंत्रित करीत आहेत. वस्तुंचे संपूर्ण तपशील आणि इतर शर्ती वेबसाईट www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत.

अ. क्र.-१, निविदा क्र.: ६०२६५९४०, नियत दिनांक: २९.०६.२०२६, सामग्रीचे वर्णन: पार्सल/लगेज स्कॅनर (विमानतळ मॉडेल) परिमाण: ०७ नग, इसारा रक्कम: ₹१०,९२,८००/- टीपा: वरील निविदा वेबसाईट www.ireps.gov.in वर देखील अपलोड करण्यात आली आहे. ई-लिलावामध्ये सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या संस्थांना सल्ला आहे की, त्यांनी स्वतःची वरील वेबसाईटवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदणी करावी, ज्याकरिता त्यांच्याकडे सीसीए इंडियाद्वारे परवाना असलेल्या प्राधिकरणाकडून श्रेणी III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र असावयास हवे. ई-निविदेकरिता व्यक्तिशः प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाहीत. अधिक तपशिलाकरिता, कृपया वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी.

क्यू आर कोड

वरिष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक,
सीपीआरओ/एस-२२ लखनौ

गाडीच्या छतावरून आणि पायदानांवर प्रवास करु नका



**SBI-SG**
One Stop Solution For All Investments

**SBI-SG GLOBAL SECURITIES SERVICES PVT. LTD.**
B-Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) Building,
SVP Road, Santacruz (W), Mumbai – 400054, Maharashtra, India

**TENDER NOTICE**

Chief Administrator & Financial officer, SBI-SG Global Securities Services Pvt Ltd, B Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) building, SVP Road, Santacruz – W, Mumbai – 400054, Maharashtra, India invites sealed bids from eligible bidders (Eligibility, Technical Bid and Commercial Bid) for supply , Installation and Support of "Hardware and Encryption Software" as per requirement mentioned in RFP number **SBISGGSS/IT/26-27/065** dated 05th June, 2026. The complete set of bidding documents along with schedule of events can be downloaded from our website **https://www.sbisgcsl.co.in/statutory/ "TENDER"** section. Complete set of bidding documents may be submitted in sealed envelopes on or before 11th June, 2026 by 11:30 pm at our registered office.

**Sd/-**
**(Amitav Kar)**
**Chief Financial Officer**


# नीट परिक्षार्थी आकांक्षाच्या आत्महत्येने राजकीय खळबळ

पान १ वरून

सापडली असून त्यात तिने परीक्षेत चांगले गुण मिळण्याची अपेक्षा होती, मात्र पुनर्परीक्षा झाल्यास तितकीच चांगली कामगिरी करता येईल की नाही याबाबत भीती व्यक्त केली होती. यावरून लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर टीका करत एक्सवर लिहिले की, एका वडिलांनी आपल्या मुलीसाठी जे काही शक्य होते ते सर्व केले. मात्र, नीट परीक्षेचा पेपर फुटला, परीक्षा रद्द झाली. त्या अनिश्चिततेच्या आणि मानसिक तणावाच्या काळात आकांक्षा आपल्याला कायमची सोडून गेली.आकांक्षाचा मृत्यू ही केवळ आत्महत्या नसून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भ्रष्ट आणि मोडकळीस आलेल्या व्यवस्थेचा परिणाम आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आजही आपल्या पदावर कायम आहेत. तीच समिती, तेच बदलीचे निर्णय, त्याच चौकशा. ना सुधारणा, ना न्याय. मोदीजी, सत्ता कायमस्वरूपी नसते ती येत-जात असते. मात्र गेल्या १२ वर्षांत शिक्षण व्यवस्थेची जी अवस्था झाली आहे, त्याची किंमत आज भारतातील संपूर्ण तरुण पिढी मोजत आहे. तर आप नेते अरविंद केजरीवाल यांनी एक्सवर म्हटले की, केवळ पुनर्परीक्षा घेणे म्हणजे न्याय नाही. शिक्षण व्यवस्थेवर कब्जा केलेल्या तथाकथित 'शिक्षण माफिया'चा अंत करणे गरजेचे आहे. आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले आहे. या विद्यार्थ्यांच्या मृत्यूला न्याय कधी मिळणार? याशिवाय तृणमूलनेही या घटनेवरून केंद्र सरकारवर निशाणा साधला. त्यांनी म्हटले की, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक दबाव निर्माण होत असून अशा घटनांसाठी सरकार जबाबदार आहे.


**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**सुचना-एसआरएम-१५**

खालील निविदा https://eprocurement.mahagenco.in वर प्रकाशित केल्या आहेत

| अ. क्र. | ई-निविदा क्र. | विषय | इसारा रक्कम/ अंदाजे रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| १ | ६६० मेगावॅट/सी अँड आय/टी-१०९/ आरएफएक्स- ३००००६७८६३ | कोराडी टीपीएस येथील बीओपी क्षेत्रातील (एचसीएसडी) प्रणाली, ३x६६० मेगावॅट युनिट क्रमांक ८, ९ व १० साठी अॅश स्लरी डेन्सिटी ट्रान्समीटरचा पुरवठा व स्थापना करण्याबाबत नॉन-डीपीआर प्रपोजल. | रु. १०९,२०६.०० / रु. १०,५७०,५५७.०० |
| २ | ६६० मेगावॅट/सीएचपी/ टी-११०/आरएफएक्स- ३००००६९२३६ | केटीपीएस, कोराडी येथील ३x६६० मेगावॅट युनिट्सच्या कोल हँडलिंग प्लांटमधील १८०० मिमी कन्व्हेयर प्रणालीसाठी आयएसआय चिन्हांकित रिटर्न आयडलर्सची खरेदी. | रु. ५७,३७२.०० / रु. ५,३८७,२००.०० |
| ३ | ६६० मेगावॅट/सीएचपी/ टी-१११/आरएफएक्स- ३००००६९१८९ | केटीपीएस, कोराडी येथील सीएचपी ३x६६० मेगावॅट युनिट्समधील कन्व्हेयर १३ ए/बी साठी स्कूप कपलिंग स्पेअर्सची खरेदी. | रु. ३६,५१६.८६ / रु. ३,३०१,६८६.०० |
| ४ | ६६० मेगावॅट/सीएचपी/ टी-११२/आरएफएक्स- ३००००६९२०१ | टंगस्टन कार्बाइड प्लेट्सचा वापर करून केटीपीएस, कोराडी येथील सीएचपी ३x६६० मेगावॅट प्रकल्पातील वॅगन टिपलर ते एप्रन फीडर भागासाठी मॉड्युलर स्कर्ट बोर्ड्सचे डिझाइन, विकास, उत्पादन, पुरवठा व उभारणी. | रु. ५३,२६०.०० / रु. ४,९७६,०००.०० |
| ५ | ६६० मेगावॅट/सी अँड आय/टी-११३/ आरएफएक्स- ३००००६८९३३ | ३x६६० मेगावॅट कोराडी टीपीएस ईएसपी येथे ड्राय अॅश इव्हॅक्युएशन व रिमोट सायलो प्रणालीच्या सामान्यी करणासाठी सोलेनॉइड्स, डायाफ्राम प्रकारचे प्रेशर ट्रान्समीटर, एअर रेग्युलेटर्स, क्विक एक्झॉस्ट व्हॉल्व्हज आणि ईएसपी पॉवर सिलिंडर सील किट्सचा पुरवठा (खुल्या निविदा पद्धतीने). | रु. ३०,१६४.७३ / रु. २,६६६,४७३.०० |
| ६ | ६६० मेगावॅट/सी अँड आय/टी-११४/ आरएफएक्स- ३००००६९०४३ | केटीपीएस, कोराडी येथील ३x६६० मेगावॅट युनिट क्रमांक ८, ९ व १० साठी ३डी बंकर लेव्हल मॉनिटरिंग प्रणालीच्या देखभाली करिता सर्वसमावेशक वार्षिक कंत्राट. | रु. २५,०८०.९९ / रु. २,१५८,०९८.९६ |
| ७ | ६६० मेगावॅट/एएचपी/ टी-११५/आरएफएक्स- ३००००६९२६८ | केटीपीएस, कोराडी येथील ३x६६० मेगावॅट अॅश हँडलिंग प्लांटमध्ये ओव्हरहॉल कालावधीत एका युनिटच्या कोर्स अॅश प्रणालीच्या पुनर्स्थापनेचे काम. | रु. ११,९५२.०० / रु. ८४५,१९५.०० |

ई-टेंडरिंगसाठी बोलिदात्यांना त्यांच्या फर्मची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
अधिक माहितीसाठी संपर्क: कार्यकारी अभियंता (खरेदी), केटीपीएस, कोराडी, नागपूर.
मोबाईल क्र.: +९१-८४११९५८६२२
ई-मेल आयडी : eepurchasekoradi@mahagenco.in

हस्ता/-
मुख्य अभियंता,(सं. व सु.)
महानिर्मिती, केटीपीएस, कोराडी



**जाहिर नोटीस**

श्रीम. वंदना चेतन शिंदे .....अपिलार्थी
विरुध्द
१. सक्षम प्राधिकारी तथा संचालक, मुंबई विकास विभाग चाळी व इतर ....उत्तरार्थी

प्रति,
१. श्रीम. लक्ष्मीबाई लगमाना बालेअगोळ, रूम नं ३७, बि.नं. १८, बी.डी.डी चाळ, ना.म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३ ...उत्तरार्थी क्र. २
२. श्रीम. आदिती आशोक पराडकर, वी-बी/३०३, वोगनेश पार्क, डोंबिवली (प) ४२१ २०२ ...उत्तरार्थी क्र. ३
३. श्री. संतोष लगमाना बालेअगोळ, रूम नं. ५०४, विंग ८, महात्मा फुले रोड, डोंबिवली (प) ४२१ २०२ ...उत्तरार्थी क्र. ४
४. श्री. सतिष लगमाना बालेअगोळ, रूम नं ३७, विं. नं. १८, बी.डी.डी चाळ, ना.म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३ ...उत्तरार्थी क्र. ५

सदर जाहिर नोटीसद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट मुंबई ४००००१ येथे **ना. म. जोशी मार्ग, बी.डी.डी चाळ क्र. १८ मधील खोली क्र. ३७ वर श्री. सतिष लगमान वालेअगोळ यांचे नावाऐवजी अपिलार्थीचे नाव समाविष्ट करून पात्र करणेसाठी** अपिल अर्ज दाखल केलेले असून, आपणांस उत्तरार्थी क्र.२, ३, ४ व ५ केले आहे. सदर प्रकरणी दि.२५.०५.२०२६ रोजीचे सुनावणीस आपण अनुपस्थित असल्याने मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी सर्व उत्तरार्थी यांना जाहिर नोटीसीद्वारे पुढील सुनावणी तारखेबाबत अवगत करणेचे निर्देश दिलेले आहे. तरी सदर प्रकरणी **सुनावणी दि.०८/०६/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** निश्चित केलेली आहे.
आपण सदर प्रकरणामध्ये उत्तरार्थी क्र. २, ३, ४ व ५ असून, सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण नियोजित **दि.०८.०६.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी मुंबई शहर यांचे दालनात उपस्थित हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमुद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणांस काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरून प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सहायक महसूल अधिकारी,**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय,**
**मुंबई शहर**



**जाहिर नोटीस (अपील क्र. ३९९/२०२६)**

श्री. सुनाजी वनाजी हनुमंतकारी ------------ अपिलार्थी
विरुध्द
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी - वांद्रे-१ व इतर ----------उत्तरार्थी

प्रति,
१. श्री. सुनिल हनुमंत अधिकारी
लेडी शहनु टेलर, तळ मजला,
पत्राचाळ, जी. एम. भोसले मार्ग,
वरळी, मुंबई - ४०००१८ ........ (उत्तरार्थी क्र. २)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधाराणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई – ४००००१. येथे **वरळी, बी.डी.डी. चाळ परीसरातील स्टॉल व इतर बांधकामाची अंतिम परिशिष्ट–२ मधील अ. क्र. २८३/झोपडी क्र. ३२२ (अनिवासी) वर पात्रतेसाठी अपिल अर्ज दाखल केलेले असून, आपणांस उत्तरार्थी क्र. २ केले आहे** प्रकरणी दि. २५.०५.२०२६ रोजीचे सुनावणीस आपण अनुपस्थित होते. त्यानुषंगाने मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस जाहिर नोटीसीद्वारे पुढील सुनावणी तारखेबाबत अवगत करणेचे निर्देश दिले आहेत. सदर प्रकरणी सुनावणी **दि. ०८.०६.२०२६ रोजी सकाळी ११.३० वा.** निश्चित केलेली आहे. आपण सदर प्रकरणामध्ये उत्तरार्थी क्र. २ असून, सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण नियोजित **दि. ०८.०६.२०२६ रोजी सकाळी ११.३० वा.** मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी, उपरोक्त नमुद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणांस काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरून प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही/–
सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई शहर

चैतन्य

# नवाकाळ

• मुंबई | शुक्रवार ५ जून, २०२६ • पान -८


## यंदा शाळा कधी होणार सुरू?



**मुंबई** - यंदा शाळा कधी सुरु होणार याबाबत संभ्रम होता. मात्र आता याबाबतच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून १५ जूनलाच शाळेची घंटा वाजणार असल्याची माहिती आहे. राज्यातील राज्य मंडळाच्या शाळांचे नवीन शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून सुरू होणार आहे. शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ पारंपरिक पद्धतीने ऑफलाईन शिक्षणातूनच होणार आहे. राज्य मंडळाशी संलग्न शाळांना २ मेपासून उन्हाळी सुटी देण्यात आली होती. १५ जूनपासून शाळा सुरु करण्याच्या निर्णयात कोणताही बदल नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# पंतनगर मनपा मराठी शाळा आम्ही बांधून देतो! पण खासगीकरण नको

## सामाजिक कार्यकर्ते संदीप राणेंची भूमिका

**मुंबई महानगरपालिकेच्या शाळा आणि त्यांचे मोक्याचे भूखंड नेहमीच वादाच्या भोवऱ्यात राहिले आहेत. घाटकोपर (पूर्व) येथील पंतनगर मनपा मराठी शाळा क्रमांक २ च्या भूखंडाबाबत सध्या असाच एक गंभीर वाद पेटला आहे. पालिकेच्या २०२४ च्या धोरणाचा आधार घेत हा कोट्यवधी रुपयांचा भूखंड अवघ्या १ रुपया प्रति चौरस मीटर दराने निर्मल एज्युकेशन या खासगी शिक्षण संस्थेला देण्याचा निर्णय झाला आहे. या निर्णयाविरोधात स्थानिक नागरिक, पालक आणि मराठी संघटनांनी एकत्र येत जनआक्रोश आंदोलन छेडले आहे. प्रशासनाचा हा निर्णय मुंबईतील मराठी शाळांचे अस्तित्व संपवणारा आणि शिक्षणाचे खाजगीकरण करणारा आहे का? नेमकी काय आहे या आंदोलनामागील भूमिका? हे जाणून घेण्यासाठी 'नवाकाळ'च्या पत्रकार गायत्री पोरजे यांनी या लढ्याचे नेतृत्व करणारे सामाजिक कार्यकर्ते संदीप राणे यांच्याशी संवाद साधला.**

**प्रश्न - पंतनगर मराठी महानगरपालिका शाळेच्या जागेबाबतचा वाद नेमका काय आहे?**

**संदीप राणे** - पंतनगर मराठी महानगरपालिका शाळा ही मूळची मराठी माध्यमाची पालिका शाळा होती. सुमारे साडेतीन हजार चौरस मीटर जागेवर ही शाळा कार्यरत होती. मराठीसह येथे हिंदी व उर्दू माध्यमाचे वर्गही सुरू होते. काही वर्षांत प्रशासनाने विद्यार्थी संख्या कमी होत असल्याचे कारण देत वर्ग कमी केले, विद्यार्थ्यांचे इतर शाळांमध्ये विलीनीकरण केले आणि शाळेची इमारत पाडण्यात आली.

**प्रश्न - शाळा पाडण्यामागे काय कारण देण्यात आले होते?**

**संदीप राणे** - प्रशासनाने पुनर्विकास आणि नवीन शैक्षणिक संकुल उभारण्याचा मुद्दा मांडला होता. मात्र आमच्या मते हा निर्णय आधीपासूनच खासगी संस्थेला जागा देण्याच्या नियोजनाचा भाग होता. विद्यार्थी संख्या मुद्दाम कमी करण्यात आली आणि त्यानंतर शाळा बंद करण्यात आली.

**प्रश्न - शाळेच्या जागेचे पुढे काय करण्यात आले?**

**संदीप राणे** - ही जागा सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर निर्मल एज्युकेशन सोसायटीला ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देण्यात आली. सुमारे ६ कोटी रुपयांचा हा करार झाल्याची माहिती आहे. आता येथे खासगी शैक्षणिक प्रकल्प उभारण्याची योजना आहे. पण तुम्हाला एवढ्या लोकांना शिक्षण द्यायची हौस आहे तर तुम्ही मार्केट रेटने प्लॉट विकत घ्या आणि शाळा बांधा. तुम्हाला पालिकेची शाळा कशाला पाहिजे? महानगरपालिकेचे भूखंड का घेत आहात? आणि तेही तीस वर्ष लीजवर आम्हाला कळत नाही का? त्या जागेचे आज मार्केटनुसार मूल्यमापन केले तर ११० कोटी किंमत आहे. या परिसरात याच संस्थेशी संबंधित काही कॉलेज आहे. त्यामुळे त्यांनी डाव करून




जागा हडपली.

**प्रश्न - या निर्णयाला विरोध का केला जात आहे आणि तुमची मागणी काय आहे?**

**संदीप राणे** - ही शाळा सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलांसाठी महत्त्वाची होती. पालिका शाळा बंद करून त्याजागी खासगी संस्था आणल्यास शिक्षण महाग होईल. आम्ही प्रशासनाला सांगितले होते की, सरकारकडे निधी नसेल तर आम्ही लोकसहभागातून शाळा बांधून देण्यास तयार आहोत. शासनाच्या आराखड्यानुसार शाळा बांधू तो खर्चही आम्हाला परत देऊ नका, मात्र शाळा सरकारीच राहिली पाहिजे ही आमची भूमिका आहे. या जागेवर पुन्हा महानगरपालिकेची शाळा उभारावी. ती सरकारी धोरणानुसार सरकारनेच चालवावी. शिक्षणाचे खासगीकरण न करता सर्वसामान्य मुलांसाठी परवडणारी आणि दर्जेदार शासकीय शाळा उपलब्ध करून द्यावी. ही आमची प्रमुख मागणी आहे.

**प्रश्न - शाळा बंद होण्यापूर्वी विद्यार्थी संख्या किती होती?**

**संदीप राणे** - मराठी माध्यमातच सुमारे साडेतीनशे ते चारशे विद्यार्थी होते. त्याशिवाय हिंदी माध्यमाचेही विद्यार्थी होते. प्रत्येक इयत्तेच्या ४-५ तुकड्या चालत होत्या. त्यामुळे शाळा पूर्णपणे ओस पडलेली नव्हती. शाळा बंद झाल्यानंतर विद्यार्थ्यांना जवळच्या दुसऱ्या स्टेशन परिसरातील महानगरपालिका शाळेत विलीन करण्यात आले. याशिवाय याच निर्मल एज्युकेशनने त्याठिकाणी एक वर्ष आधी प्रायोगिक तत्त्वावर कॉलेजही सुरू केले होते. म्हणजे त्यांनी नियोजन करून शाळेची जागा ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला.

**प्रश्न - परिसरातील सर्वच पक्षांचे नेते या निर्णयाच्या विरोधात आहेत? त्यामुळे आंदोलकांकडून कोणते पाऊल उचलले जात आहे?**

**संदीप राणे** - भाजपा नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत निर्मल एज्युकेशन सोसायटीच्या नवीन शाळा इमारतीचे भूमिपूजन केले होते. मात्र स्थानिक पातळीवर उबाठा, भाजपा, शिंदे सेना, मनसे, मराठी एकीकरण समिती, यांच्यासह विविध राजकीय पक्ष, सामाजिक संस्था आणि स्थानिक संघटनांचा या निर्णयाला विरोध आहे. यासाठी आम्ही सह्यांची मोहीम सुरू केली आहे. हजारो नागरिकांनी पाठिंबा दिला आहे. सरकार देवस्थानला कोट्यवधींची देणगी देते मग शिक्षणासाठी का नाही? सरकारला पैसे द्यायचे नसतील तर आम्ही शाळा उभी करू, पण त्याठिकाणी पालिकेची शाळा झाली पाहिजे. प्रशासकीय राजवटीत झालेला हा निर्णय आम्ही बदलायला भाग पाडू. यासाठी मोर्चे, आंदोलन आणि पुढे कायदेशीर लढाही दिला जाईल.

## व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्ष भारतात पंतप्रधान मोदी यांनी स्वागत केले

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी आज राजधानी दिल्लीत व्हेनेझुएलाच्या हंगामी राष्ट्राध्यक्ष डेल्सी एलोइना रॉड्रिग्ज यांची भेट घेत त्यांचे स्वागत केले. डेल्सी रॉड्रिग्ज या पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर आल्या असून त्यांच्या दौऱ्याला दोन्ही देशांच्या संबंधांच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे. विशेष म्हणजे, व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्ष भारत दौऱ्यावर येणार आहेत, याची घोषणा काही दिवसांपूर्वी भारत भेटीवर आलेले अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी केली होती.



हैदराबाद हाऊस येथे झालेल्या या भेटीत भारत-व्हेनेझुएला संबंध अधिक बळकट करण्याबाबत तसेच ऊर्जा सुरक्षा, व्यापार व गुंतवणूक, औषधनिर्माण, आरोग्यसेवा, वाहतूक आणि नवीकरणीय ऊर्जा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती आहे. दोन्ही देशांमध्ये ऊर्जा क्षेत्रात दीर्घकाळापासून सहकार्य आहे. भारतीय सार्वजनिक क्षेत्रातील अनेक कंपन्यांनी व्हेनेझुएलाच्या ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक केली असून भविष्यातही या क्षेत्रातील भागीदारी वाढवण्यावर भर दिला जात आहे.

## मुलगी गेली! आर्थिक मदत कधी? पिंकी माळीच्या वडिलांचा आक्रोश

■ मुंबई

**जानेवारी** महिन्यात बारामती विमानतळावर झालेल्या भीषण विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह फ्लाइट अटेंडंट पिंकी माळी हिचा मृत्यू झाला होता. अपघातानंतर त्यांच्या कुटुंबियांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन मिळाले होते. मात्र, चार महिने उलटूनही मुख्यमंत्री सहायता निधी आणि विम्याची रक्कम मिळाली नसल्याने माळी कुटुंबियांना अद्यापही मदतीसाठी वणवण करावे लागत आहे.

शिवकुमार माळी यांनी सांगितले की, अपघातानंतर व्हीएसआर कंपनीचे मालक व्ही.के.सिंह यांनी संपर्क साधून अंतरिम मदतीबाबत विचारणा केली होती. मात्र, पिंकी माळी यांच्या विम्याची एकूण रक्कम किती आहे, तसेच त्यांना मिळणारे हक्काचे मानधन किती आहे, याची कोणतीही स्पष्ट माहिती कंपनीकडून मिळालेली नाही. मुलगी तर परत येणार नाही, पण तिचे हक्काचे पैसे किती आहेत हे तरी आम्हाला सांगितले पाहिजे. विम्याची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी चार महिने लागतात का? कंपनीकडून सातत्याने टाळाटाळ होत आहे. मुख्यमंत्री सहायता निधीबाबत बोलताना शिवकुमार माळी म्हणाले की, बारामतीमधील एका अधिकाऱ्याने फोन करून पाच लाख रुपयांची मदत मंजूर झाल्याचे सांगितले होते. मात्र, ही रक्कम अपुरी असल्याचे सांगत त्यांनी ती स्वीकारण्यास नकार दिला.

## कॉकरोच पार्टीच्या अभिजित दीपकेला अमेरिकेतून हद्दपार केल्याची चर्चा

■ नवी दिल्ली

**गेल्या** काही दिवसांपासून कॉकरोच जनता पार्टी संस्थापक अभिजित दीपकेला अमेरिकेतून हद्दपार करण्यात आल्याची चर्चा होत आहे. शायन कृष्णा या इन्फ्लुएन्सर्सने दीपकेला अमेरिकन प्रशासनाने जबरदस्तीने भारतात पाठविल्याचा दावा केला आहे. मात्र, या दाव्यांना अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी मिळालेली नाही.



अभिजित दीपकेने स्वतः एका व्हिडिओ संदेशाद्वारे ६ जून रोजी भारतात परतणार असल्याचे जाहीर केले.


» पान २ वर


### शायन कृष्णा कोण आहे?

शायन कृष्णा पूर्वी शायन अली या नावाने ओळखला जात असे. त्यांचा जन्म २८ सप्टेंबर २००४ रोजी कराची येथे झाला. शायन सध्या अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथे वास्तव्यास आहे. तो सोशल मीडिया इन्फ्लुएंसर, मॉडेल, अभिनेता आणि टीव्ही पॅनेलिस्ट म्हणून काम करतो. २०२३ मध्ये त्याने इस्लाम धर्म सोडून हिंदू धर्म स्वीकारत शायन कृष्णा हे नाव धारण केले. 'द ब्लॉन्ड देसी' या नावानेही तो सोशल मीडियावर लोकप्रिय आहे. पाकिस्तानातील काही वादग्रस्त घडामोडींनंतर त्याने २०१९ मध्ये देश सोडला. त्याने अभिनयाचे शिक्षण घेतले असून काही आंतरराष्ट्रीय वेबसीरिजमध्ये काम केले आहे. विविध वृत्तवाहिन्यांवर तो सामाजिक व राजकीय विषयांवर मते मांडतो.

## पुण्यातील विप्रोवर धार्मिक छळाचा आरोप

■ पुणे

**नाशिकमधील** टीसीएस कंपनीत हिंदू महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ व धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा प्रकार उघडकीस आला होता. आता पुण्यातील एका महिलेने आयटी क्षेत्रातील कंपनी विप्रो टेक्नॉलॉजीजवर धार्मिक छळ, कामाच्या ठिकाणी भेदभाव आणि जबरदस्तीने राजीनामा घेतल्याचे गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून कंपनीला कायदेशीर नोटीसही पाठविण्यात आली आहे. पीडित महिलेने ५० लाख रुपयांच्या

### नुकसानभरपाईची मागणी

नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

हे आरोप पुण्यातील हिंदू जनजागृती समितीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आले. यावेळी संबंधित माजी कर्मचाऱ्याने हिंजवडी येथील कार्यालयात काम करत असताना घडलेल्या घटनांची माहिती दिली. महिलेच्या म्हणण्यानुसार, ऑगस्ट २०२५ मध्ये तिला एका टीम मीटिंगसाठी बोलावण्यात आले होते. त्या बैठकीत तिच्यावर राजीनामा देण्यासाठी दबाव टाकण्यात आला. तिला स्वतःची बाजू मांडण्याची संधी न देता राजीनामा घेण्यात आला.

## पंजाबमध्येही लाडकी बहीण दरमहा १,००० रुपयांची मदत

■ अमृतसर

**पंजाबमध्ये** विधानसभा निवडणुकीला एका वर्षापेक्षाही कमी कालावधी शिल्लक असताना मुख्यमंत्री भगवंत मान यांनी मोठी घोषणा केली की, पंजाबमधील ५२ लाख महिलांना मुख्यमंत्री मावां धियां सत्कार योजनेअंतर्गत १ जुलैपासून दरमहा १,००० रुपयांची आर्थिक मदत मिळण्यास सुरुवात होईल. या योजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थी महिलांना दरमहा १,५०० रुपये मिळतील. मान यांनी सांगितले की, या योजनेसाठी आवश्यक निधी आधीच मंजूर केला. ३५ लाख महिलांना लाभार्थी कार्ड वितरित केलेले आहेत. ही योजना दीर्घकाळापर्यंत सुरू राहील व त्याकडे केवळ एक तात्पुरती उपाययोजना म्हणून पाहिले जाऊ नये.

## शेअर बाजारात १५ लाख कोटींचा घोळ कंपनीचा शेअर १,००० वरून १०० वर

■ मुंबई

**राजेश** एक्सपोर्ट्स या गुंतवणुकदारांना मोठे परतावे देणाऱ्या कंपनीच्या लाखो गुंतवणुकदारांना आज मोठा धक्का बसला. एकेकाळी १,०२९ रुपयांपर्यंत पोहोचलेला कंपनीचा शेअर बाजार उघडताच १०३.९२ रुपयांवर घसरला. त्यानंतर खरेदीदारच गायब झाल्याने शेअर लोअर सर्किटमध्ये अडकला. त्यामुळे गुंतवणुकदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला. सेबीने जारी केलेल्या एका अंतरिम आदेशामुळे कंपनीची घसरण झाली.

सेबीच्या आदेशानुसार, २०२०-२१ ते २०२४-२५ या वित्तीय वर्षांत कंपनीने सुमारे १५.१५ लाख कोटी रुपयांचा एकत्रित (कन्सॉलिडेटेड) महसूल दाखवला होता. तपासादरम्यान या महसुलातील मोठ्या भागाची स्वतंत्र पडताळणी होऊ शकली नाही. सेबीच्या आरोपानुसार या कालावधीत कंपनीच्या एकूण एकत्रित महसुलापैकी तब्बल ९९.८० टक्के हिस्सा अशा आकडेवारीवर आधारित होता, ज्याची स्वतंत्रपणे खातरजमा करता आली नाही. कंपनीच्या एकत्रित महसुलापैकी ९७ ते ९९ टक्के हिस्सा परदेशातील उपकंपन्यांमधून दाखवण्यात आला होता. सोन्याच्या रिफायनिंग आणि प्रोसेसिंग व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाची नोंद.


» पान ५ वर


## संतश्रेष्ठ तुकोबा महाराजांची पालखी २४ जुलैला पंढरीत

### ७ जुलैला देहूतून पालखीचे प्रस्थान

■ पुणे

**जगद्गुरु** संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याचे वेळापत्रक अधिकृतपणे जाहीर झाले आहे. ही पालखी ७ जुलै रोजी श्रीक्षेत्र देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान करेल आणि १८ दिवसांचा प्रवास पूर्ण करून २४ जुलैला पंढरपुरात दाखल होईल, अशी माहिती श्री संत तुकाराम महाराज संस्थानने दिली.

पालखीचे प्रस्थान ७ जुलै रोजी झाल्यानंतर पहिला मुक्काम देहू येथील इनामदार वाड्यात असेल. ८ जुलै रोजी पालखी इनामदार वाड्यातून प्रस्थान केल्यानंतर पहिल्या अभंग



आरतीसाठी अनगडशहा बाबा दर्गा परिसरात, तर दुसऱ्या अभंग आरतीसाठी चिंचोली येथील पादुका मंदिरात थांबेल. त्यानंतर संध्याकाळी आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात पालखीचा मुक्काम असेल. यानंतर ९ व १० जुलै रोजी पुण्यातील नाना पेठ येथे मुक्काम होणार आहे. ११ जुलै रोजी लोणी काळभोर, १२ जुलै रोजी यवत, १३ जुलैला वरवंड, १४ जुलैला उंडवडी गवळ्याची व १५ जुलै रोजी बारामती येथे मुक्काम असेल. १६ जुलैला काटेवाडीत पहिले मेंढ्याचे रिंगण आणि १७ जुलैला पहिले गोल रिंगण होईल. अशा प्रकारे पालखी विविध ठिकाणी मुक्काम करत २३ जुलैला बाजीराव विहीर येथे पोहचेल. त्यानंतर २४ जुलै रोजी पंढरपूर येथे आगमन होईल.

## मध्य रेल्वेवर कल्याण-इगतपुरी दरम्यान ६ जूनला १३ तासांचा मेगा ब्लॉक

■ मुंबई

**मध्य** रेल्वेच्या कल्याण-इगतपुरी मार्गावर ६ जून रोजी १३ तासांचा ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे अनेक लांब पल्ल्याच्या एक्स्प्रेस गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार असून काही गाड्या रद्द, काहींचे मार्ग बदलले जाणार आहेत. तसेच काही गाड्यांचा प्रवास नियोजित स्थानकापूर्वीच थांबविण्यात येणार आहे.

मध्य रेल्वे प्रशासनाने ब्लॉकचे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार ६ जूनला दु.२ वाजल्यापासून ७ जूनच्या पहाटे ३ वाजेपर्यंत हा मेगा ब्लॉक राहणार आहे. आठगाव रेल्वे स्थानकावर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी हे काम हाती घेण्यात येत आहे. या ब्लॉकचा परिणाम कसारा, इगतपुरी, नाशिक रोड तसेच पुढे जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांवर होणार आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी काही गाड्या पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहेत, तर काही गाड्यांचा प्रवास शॉर्ट अर्ध्यावर संपवण्यात येणार आहे. ब्लॉकमुळे गाडी क्रमांक ११०११ सीएसएमटी-धुळे एक्स्प्रेस, ११०१२ धुळे-सीएसएमटी एक्स्प्रेस, १२१०९ सीएसएमटी-मनमाड पंचवटी एक्स्प्रेस आणि १२११० मनमाड-सीएसएमटी पंचवटी एक्स्प्रेस या गाड्या पूर्णपणे रद्द करण्यात आल्या आहेत.

## विमानतळावर सेल्फी-रील्सवर बंदी नियम मोडल्यास मोबाईल जप्त

**विमानतळावर सेल्फी घेणे, रील्स बनवणे किंवा ट्रॅव्हल व्लॉगचे चित्रीकरण करणे आता प्रवाशांना महागात पडू शकते. विमानतळावरील संवेदनशील ठिकाणांची माहिती समाज माध्यमातून सार्वजनिक होऊन सुरक्षेला धोका निर्माण होऊ नये, यासाठी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) नवी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवाशांचा मोबाईल जप्त करण्याबरोबरच दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. गंभीर प्रकरणांमध्ये संबंधित प्रवाशाचा नो-फ्लाय लिस्टमध्येही समावेश केला जाऊ शकतो.**

■ मुंबई

**अलीकडच्या** काळात विमानतळांवर रील्स, व्हिडिओ ब्लॉग, लाइव्ह स्ट्रीमिंग व सोशल मीडिया कंटेंट तयार करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणा, विमानतळ संचालन व्यवस्था व संवेदनशील पायाभूत सुविधांशी संबंधित माहिती नकळतपणे सार्वजनिक होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. यामुळे डीजीसीएने हे निर्बंध लागू केले आहेत. नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सुरक्षा तपासणी केंद्रे, बोर्डिंग गेट्स, रनवे बस, विमान हाताळणी क्षेत्रे, टॅक्सीवे आणि विमानतळातील इतर प्रतिबंधित विभागांमध्ये फोटो किंवा व्हिडिओ चित्रीकरणास परवानगी दिली जाणार नाही. अशा ठिकाणी चित्रीकरण करताना आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



## रिंग रोड प्रकरणी बैठक घ्या अन्यथा भाजपा कार्यालयाला घेराव

■ नाशिक

**रिंग रोड** बाधित शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्यासाठी ८ जूनपर्यंत शासन स्तरावरील निर्णायक बैठक घ्यावी. अन्यथा नाशिक शहरातील भाजपा पक्ष कार्यालयाला हजारो शेतकरी घेराव घालतील, असा इशारा छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी दिला. याप्रकरणी पाथर्डी येथे रिंग रोड बाधित शेतकऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीला आ. सरोज अहिरे यांच्यासह २५ गावांतील शेतकरी संख्येने उपस्थित होते.

गेल्या अनेक महिन्यांपासून रिंग रोड बाधित शेतकरी विविध आंदोलन, निवेदने, बैठका आणि चर्चांच्या माध्यमातून आपल्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवत आहेत. बैठकीत गावनिहाय आढावा घेण्यात आला. विविध गावांमध्ये दाखल झालेल्या

### करण गायकर यांचा इशारा

तक्रारी, कलम १९ व २१ अंतर्गत आलेल्या नोटिसा, त्यावरील उत्तरे आणि नवीन अलाइनमेंट संदर्भातील घडामोडींवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी आमदार सरोज अहिरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून शेतकऱ्यांची भूमिका मांडण्यासाठी वेळ मागितले.

## इंडिया आघाडीची ८ जूनला बैठक डीएमके सहभागी होणार नाही

**नवी दिल्ली** - नवी दिल्लीत ८ जून रोजी होणाऱ्या महत्त्वाच्या बैठकीआधीच विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीला मोठा धक्का बसला. तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री एम.के.स्टॅलिन यांचा द्रविड मुनेत्र कळघम पक्षाने (डीएमके) या बैठकीत सहभागी होणार नसल्याचे आज जाहीर केले. मात्र डीएमकेने अद्याप इंडिया आघाडीतून अधिकृतपणे बाहेर पडण्याचे संकेत दिलेले नाहीत. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत डीएमके आणि काँग्रेस एकत्र लढले होते. मात्र, निकालानंतर काँग्रेसने दीर्घकाळाची मित्रपक्ष असलेल्या डीएमकेची साथ सोडली. काँग्रेसने अभिनेता थलपती विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम पक्षाला सरकार स्थापनेसाठी थेट पाठिंबा दिला आणि त्यांच्या आघाडी सरकारमध्ये सामील झाले. काँग्रेसने डीएमकेचा विश्वासघात केल्याची भावना द्रमुकच्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळेच पक्षाने ८ जूनच्या बैठकीला न जाण्याचा निर्णय जाहीर केला. डीएमकेने एका निवेदनात म्हटले की, आम्ही बैठकीतून माघार घेतली म्हणजे राष्ट्रीय महत्त्वाच्या मुद्यांवरून माघार घेतली असे अजिबात नाही.